
पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 24 । 16 डिसेंबर, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# देवेंद्र पर्व



## अध्यक्षीय मनोगत

# 'देवेंद्र पर्वाच्या शुभेच्छा'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी मुंबईत ५ डिसेंबर २०२४ रोजी आझाद मैदानात थाटात झाला. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्यासह अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून आशिर्वाद दिला. भारतीय जनता पार्टीतर्फे मी मा. देवेंद्रजींचे अभिनंदन करतो आणि त्यांना नव्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतो. मा. देवेंद्रजींचा यापूर्वी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी मुंबईत वानखेडे मैदानावर मुख्यमंत्रीपदाचा ऐतिहासिक शपथविधी झाला होता. त्यांच्या २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत महाराष्ट्र राज्याने सर्वसमावेशक विकासाची प्रचंड गती अनुभवली. विजेच्या लोडशेडिंगसारखे अनेक जुने प्रश्न सुटले. आधीच्या पंधरा वर्षांच्या काँग्रेस आघाडीच्या काळात राज्याची झालेली घसरण थांबली. भाजपा महायुती सरकारच्या पहिल्या कार्यकाळात मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वात नवी उमेद निर्माण झाली. जनतेने मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वातील सरकारच्या कामगिरीची पावती म्हणून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला पूर्ण बहुमत दिले. १९८५ नंतर प्रथमच एखाद्या पक्षाला किंवा निवडणूकपूर्व युतीला राज्यात पूर्ण बहुमत मिळाले होते. तथापि, उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या हव्यासामुळे विश्वासघात झाला आणि भाजपाला विरोधी पक्ष व्हावे लागले. ३० जून २०२२ रोजी पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मा. देवेंद्रजींच्या साथीने महायुतीचे सरकार सत्तेवर आले. या सरकारने गेल्या अडीच वर्षात प्रभावी कामगिरी केली आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने ऐतिहासिक जनादेश दिला. या पार्श्वभूमीवर मा. देवेंद्रजींनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. यामुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची भावना आहे आणि राज्यातील जनतेला दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री म्हणून मा. देवेंद्रजींनी यापूर्वी केलेले काम लोकांच्या लक्षात आहे. त्यांच्याकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत. महाराष्ट्र हे देशाचे विकासाचे इंजिन आहे. मा. मोदीजींच्या नेतृत्वात देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे ध्येय आपण ठेवले आहे. यामध्ये एक ट्रिलिअन डॉलर्सची अर्थव्यवस्था करून महाराष्ट्र खूप मोठे योगदान देऊ शकतो. सध्या राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ५०० अब्ज डॉलर्सची आहे. म्हणजे आगामी पाच वर्षात राज्याची अर्थव्यवस्था दुप्पट करायची आहे. त्यासोबत लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज, युवा कार्य प्रशिक्षण योजना अशा अनेक कल्याणकारी योजना चालू ठेवायच्या आहेत. निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करायची आहेत. हे सर्व मा. देवेंद्रजी करू शकतात असा ठाम विश्वास जनतेत आहे. त्यांचे समर्थ नेतृत्व, प्रशासनावरील पकड, पारदर्शी व्यवहार, जनसामान्यांविषयीची संवेदनशीलता आणि राज्याच्या विकासाबद्दलची समर्पणाची भावना जनतेने अनुभवली आहे. आता त्यांच्या पाठीशी २८८ पैकी २३७ आमदारांचे ऐतिहासिक भक्कम पाठबळ आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची त्यांना साथ आहे. राज्यात दुसरे देवेंद्र पर्व सुरू झाले आहे. या पर्वात महाराष्ट्र राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी तसेच राज्यातील महिला, युवक, शेतकरी, गरीब, वंचित, पीडीत, मागास अशा सर्वांच्या कल्याणासाठी मा. देवेंद्रजींना कोटी कोटी शुभेच्छा.


**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग



०४ परिश्रम, अभ्यास आणि 'संघशक्ती'चा विजय


०७ जनतेचा विश्वास सार्थ ठरविणार



१० 'देवा'ची काठी!


१३ फडण'वीस'...२१ !



१४ आता महाराष्ट्र थांबणार नाही!


१७ राजकारणाचा चक्रव्यूह भेदणारे आधुनिक अभिमन्यू



संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया, bjpmaha.manogat@gmail.com editor.bjpmanogat@gmail.com येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०

# परिश्रम, अभ्यास आणि 'संघशक्ती'चा विजय




● **चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष**

> परिश्रम, पूर्वीच्या मतदानाचा अभ्यास करून आखलेली रणनीती, पंतप्रधान मोदी यांचा 'एक है तो सेफ़ है'चा नारा, लाभार्थी संपर्क, एससी, एसटी समाजाच्या मनातील संविधानाबाबतचा गैरसमज दूर करण्यात आलेले यश, महायुतीतील उत्तम समन्वय, विचार परिवाराचा पाठिंबा अशा अनेक कारणांमुळे महायुतीचा महाविजय साकारला.

**यावेळच्या** लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झाले होते. मतदारांमध्ये निरुत्साह होता. फेक नॅरेटीव्हमुळे भाजपा विरोधात मोठ्या प्रमाणात मतदान झाले. भाजपाच्या अनेक मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदान केले नव्हते त्यांना लोकसभेचा निकाल लागल्यानंतर पश्चाताप झाला. अशा मतदारांना मतदानासाठी संघटनेने बाहेर काढल्याने एकूण मतदान ५ टक्के वाढले.

लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे बूथवार विश्लेषण केल्यानंतर असे आढळले की, ज्या बूथमध्ये गेली २० वर्षे भाजपाला चांगले मतदान होत होते तेथे यावेळी एकूण मतदान कमी झाले. ज्या बूथमध्ये १५ ते ३५ टक्के मतदान झाले होते अशा सी कॅटेगिरीच्या बूथमध्ये भाजपा कमजोर झाल्याचे आढळले. लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे आम्ही विधानसभावार बूथनुसार विश्लेषण केले. मतदानानुसार बूथची ए, बी, सी अशी वर्गवारी केली. भाजपाचे परंपरागत मतदान असलेल्या ए वर्गाच्या बूथमध्ये

१० टक्के मतदान वाढविणे तर सी वर्गाच्या बूथमध्येही १० टक्के मतदान वाढविणे असे उद्दिष्ट ठेऊन मतदारसंघांनुसार एबीसी बूथच्या पुस्तिका तयार करून बूथ व्यवस्थापन केले.

लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या पक्षाच्या पुणे येथील महाअधिवेशनास ९ हजार प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिले की लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीला महाविकास आघाडीपेक्षा केवळ दोन लाख मते कमी मिळाल्याने २५ खासदार कमी झाले. मतांची तूट भरून काढून विधानसभेला जिंकू शकतो, असा विश्वास श्री. अमित शाह आणि देवेंद्रजींनी कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण केला.

लोकसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमधील चुकांचाही आम्हाला फटका बसला होता. अनेक ठिकाणी आपल्या मतदारांची नावे वगळली गेली होती. मतदान केंद्रे गैरसोयीची होती. यासंदर्भात पक्षाच्या आमदारांच्या बैठका घेतल्या व प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मतदारयादी दुरुस्तीसाठी मोहीम राबविली. मतदारयादीतील चुका आयोगाच्या निदर्शनाला आणल्या. मतदान केंद्रांबाबत मतदारांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले, तेही आयोगासमोर मांडले. त्यामुळे याबाबतीत सुधारणा झाली.

भाजपा महायुती सरकारने लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा योजना आणल्या. योजनांच्या अंमलबजावणीत मदत करण्यापासून लाभार्थ्यांशी संपर्क साधण्यापर्यंत विविध कामे पक्ष संघटनेने केली. एकेका मतदारसंघात ३० ते ४० हजार बहिणींचा सन्मान पक्षातर्फे करण्यात आला. परिणामी मतदार भाजपाशी जोडला गेला. केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांनी लोकसभा निवडणुकीनंतर राज्याचा विस्तृत प्रवास केला. प्रत्येक विभागात त्यांनी तालुका अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष असे पदाधिकारी आणि पंचायत ते पार्लमेंट अशा पातळीवरील सर्व लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. त्यांनी रणनीतिबद्दल मार्गदर्शन केले तसेच निवडणूक जिंकण्याबद्दल आत्मविश्वास निर्माण केला. या मोहिमेत पक्षाच्या १० हजार पदाधिकार्यांशी संवाद साधला गेला. पक्षाच्या नेत्यांनी विधानसभा निवडणूक अंगावर घेतली आणि मनापासून काम केले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात यापूर्वी विविध निवडणुकांमध्ये जिंकलेल्या किंवा हरलेल्या अशा १५० नेत्यांना जबाबदारी दिली.

पक्षाचे राज्याचे निवडणूक प्रभारी व केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव तसेच सह प्रभारी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मार्गदर्शनात निवडणूक व्यवस्थापनासाठी विभागानुसार ६४ कार्यकर्त्यांची नियुक्ती केली व त्यांनी राज्यभर त्या त्या विभागाच्या कामाची देखरेख केली. सलग दोन महिने ही प्रक्रिया चालू होती. महायुतीमध्ये जागा वाटपाबाबत कोणताही टोकाचा आग्रह नव्हता. केवळ उमेदवार निवडून आणणे यावर भर देऊन जागवाटप झाले. निवडणुकीच्या काळात कोणताही वादंग झाले नाही. आम्ही कोणाला मुख्यमंत्री करण्यासाठी नव्हे तर महायुतीला विजयी करण्यासाठी लढत होतो. भाजपाचे विधानसभेचे उमेदवार निवडताना सर्व स्तरावर चर्चा झाली. विधानसभा मतदारसंघातील कोअर ग्रुपमध्ये चर्चा झाली. तेथे प्रत्येकी १५० नेत्यांना मतदानाची संधी देऊन मतपेट्यांमध्ये गुप्त मतदान झाले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात उमेदवारीसाठी तीन तीन नावे निवडली. या प्रक्रियेतून रास्त नावे पुढे आली. त्यानंतर त्या नावांवर जिल्हा, विभाग आणि प्रदेश पातळीवर कोअर कमिटीत चर्चा झाली. उमेदवारांची निवड करताना सामाजिक आणि विभागीय समतोल राखण्यात आला.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी निवडणूक प्रचार सभांमध्ये 'एक है तो सेफ़ है', असा संदेश दिला. हा निवडणुकीचा नॅरेटीव्ह ठरला. लोकसभा निवडणुकीत जरांगे यांच्या आंदोलनाचा फटका भाजपाला बसला. विधानसभा निवडणुकीच्या वेळी मराठा समाजात स्पष्ट संदेश गेला की, मराठा समाजाला महायुतीमुळे फायदा आहे आणि महाविकास आघाडी या समाजाची फसवणूक करत आहे. त्यामुळे या समाजातील भाजपाबद्दलचा गैरसमज दूर झाला. लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आले. राज्याचा विकास करण्यासाठी तसेच मोठे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मोदीजींच्या विचारांचेच सरकार राज्यात हवे, डबल इंजिनमुळे विकास होईल, हा मुद्दा मतदारांमध्ये पोहोचला. लाडकी बहीणसारख्या कल्याणकारी योजना महायुतीच चालू ठेवेल, महाविकास आघाडी या योजना बंद पाडेल, असा स्पष्ट संदेश मतदारांमध्ये गेला. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात शंभर सामाजिक बैठका झाल्या. या बैठका ५० ते १०० एवढ्याच उपस्थितीच्या होत्या. त्यातून ओबीसींच्या विविध समाजांशी संपर्क साधण्यात आला. संख्याबळानुसार

छोट्या असलेल्या विविध जातींसाठी महामंडळांची घोषणा झाली. राज्य पातळीवर सुमारे ९० समाजांच्या प्रतिनिधींशी भाजपाच्या सर्वोच्च नेत्यांच्या बैठका झाल्या. यातून ओबीसी मतदार एकवटले. मध्य प्रदेशमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते कैलाश विजयवर्गीय हे पश्चिम बंगालचे निवडणूक प्रभारी होते. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्यासारख्या एका राज्याची जबाबदारी हाताळू शकणाऱ्या ३८ नेत्यांना प्रत्येकी आठ विधानसभा मतदारसंघांची मर्यादित जबाबदारी दिली होती. त्यासोबत ३८५ प्रवासी कार्यकर्ते अन्य राज्यातून आले होते. त्यांनी प्रत्येकी ४० कार्यकर्ते सोबत आणले होते. अशा प्रवासी कार्यकर्त्याला एक एक विधानसभा मतदारसंघाची निश्चित जबाबदारी दिली होती. त्यांनी ही निवडणूक आपली समजून काम केले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी संविधान बदलणार या फेक नॅरेटीव्हमुळे अनुसूचित जातींमध्ये मतदानाचा फटका बसला होता. त्याबाबतीत वस्तुस्थिती सांगून या समाजाच्या मनातील भीती दूर करण्यात आपल्याला यश आले. लोकसभा निवडणुकीत आरक्षण रद्द होणार या खोट्या प्रचारामुळे आदिवासी समाज भाजपापासून दुरावला होता. विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांचा गैरसमज दूर करून दुरुस्ती केली. एकूण रचना, नियोजन, प्रचार यामुळे मतदानाच्या आधी शेवटचे पाच दिवस राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा येईल, असा विश्वास निर्माण झाला. महाविकास आघाडीतील दोन महत्त्वाचे घटक पक्ष– शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे यांची शिवसेना– यांना संघटनात्मक अडचणी आल्या. शिवसेनेचे बहुतेक कर्तबगार नेते मा. एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले तर राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रभावी नेत्यांनी मा. अजित पवार यांना साथ दिली. परिणामी उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्या पक्षांना विधानसभा मतदारसंघांमध्ये चांगल्या उमेदवारांची चणचण भासली. काँग्रेस पक्षाला अति आत्मविश्वास होता. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीत जिंकू, आता फक्त मुख्यमंत्री ठरविणे बाकी आहे, अशा आविर्भावात काँग्रेस पक्ष वावरत होता. भारतीय जनता पार्टीने मात्र लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यातून धडा शिकला आणि पक्षाने आपल्या संसाधनांचे प्रभावी व्यवस्थापन केले. मा. मोदीजी, मा. अमितभाई, मा. नड्डाजी, मा. नितीन गडकरीजी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अशा भाजपाच्या स्टार प्रचारकांनी राज्यात झंझावती प्रचार केला. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील राजकीय व सामाजिक समीकरणे ध्यानात घेऊन आणि विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या मागणीनुसार स्टार प्रचारकांच्या नेमक्या सभा आयोजित करण्यात आल्या.मित्रपक्षांसोबत भाजपाचा उत्तम समन्वय होता. भाजपाने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १४ उमेदवार दिले व त्यापैकी ७ विजयी झाले तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ६ उमेदवार दिले व त्यापैकी ३ विजयी झाले. भाजपाचे मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडलेच. त्यासोबत महायुतीतील विविध पक्षांच्या मतदारांची मते एकमेकांना ट्रान्स्फर झाली. परिणामी लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये महायुतीला असलेली २ कोटी ४८ लाख मते ३ कोटी ११ लाखावर पोहोचली म्हणजे ६३ लाख मतांची वाढ झाली. दुसरीकडे महाविकास आघाडीची लोकसभा निवडणुकीतील २ कोटी ५० लाख मते विधानसभेला २ कोटी १७ लाखावर आली. भाजपाने १४९ जागा चिन्हावर लढविल्या, त्यापैकी १३२ जिंकल्या. भाजपाने लढविलेल्या एकूण १४९ मतदारसंघांतील भाजपाची मते ५१.७८ टक्के आहेत. **विचार परिवाराने संपूर्ण शक्तीनिशी मतदान वाढण्यासाठी प्रयत्न केले. परिवारातील सर्व ३५ संघटनांचे कार्यकर्ते कामाला लागले होते. एकही स्वयंसेवक घरी बसला नाही. देव, देश आणि धर्मासाठी मतदान करणारा प्रत्येक मतदार मतदानाला गेलाच पाहिजे, अशा निर्धाराने परिवाराने काम केले. त्याचा खूप मोठा फरक पडला.** महायुतीचे लोकसभा निवडणुकीतील ३३ टक्के मतदान विधानसभेला ४९ टक्क्यांवर गेले. भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाला निर्णय प्रक्रियेबाबत संपूर्ण स्वातंत्र्य दिले. विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये जनतेने भाजपा–महायुतीला पूर्ण बहुमत दिले होते पण त्यावेळी मा. देवेंद्र फडणवीस यांच्यावर अन्याय झाला व ते मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. २०२२ मध्येही ते मुख्यमंत्री झाले नाहीत तर त्यांना उपमुख्यमंत्री व्हावे लागले. या दोन घटनांमुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये मा. देवेंद्रजींविषयी सहानुभूती निर्माण झाली व आता ते मुख्यमंत्री झालेच पाहिजेत, अशी जिद्द निर्माण झाली. या जिद्दीतून कार्यकर्ता जोमाने प्रचारात सहभागी झाला. ■

# जनतेचा विश्वास सार्थ ठरविणार



देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्राचे भारतीय जनता पक्षाचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची सह्याद्री वाहिनीसाठी घेतली मुलाखत. या मुलाखतीचा संक्षिप्त अंश...

**आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी सोहळ्याप्रसंगी लोटलेल्या अथांग जनसागराकडे पाहून तुम्हाला कसे वाटले?**

एवढ्या मोठ्या जनसागराकडे पाहत असताना मला नक्कीच आनंद झाला पण, त्यासोबत माझ्यावर असलेल्या जबाबदारीची जाणीव देखील झाली. जे यश या निवडणुकीत जनतेने मिळवून दिले आहे, ते फक्त साजरे करण्यासाठी नसून त्यातून प्रेरणा घेऊन जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आहे. मला असे वाटते की भारतीय जनता पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला शपथविधी सोहळा पाहत असताना आनंद झाला आहे.

**शपथविधी दरम्यान 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' अशी टॅगलाईन झळकत होती, तर महाराष्ट्र आता कुठल्या दिशेने पुढे जाणार आहे ?**

अडीच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन झाले, एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री झाले तर मी आणि अजितदादा पवार उपमुख्यमंत्री झालो. आम्ही तिघांनी एकत्रितरित्या अतिशय वेगाने महाराष्ट्राला ट्रॅकवर आणले. जे प्रकल्प मी मुख्यमंत्री असताना सुरु होते त्यांना गती मिळाली तर काहींचे लोकार्पण झाले. अनेक नवीन योजना सुरु केल्या. या सर्व गोष्टी आता वेगाने पुढे नेताना महाराष्ट्र आता थांबणार नाही. येणाऱ्या काळातही अनेक नवीन योजना, प्रकल्प सुरु करायचे आहेत परंतु माझा भर हा नदीजोड प्रकल्पांवर असणार आहे. सध्या मी चार नदीजोड प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. हे प्रकल्प महाराष्ट्राला दुष्काळातून कायमस्वरूपी मुक्त करतील. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे ग्रीन एनर्जीवर माझा भर राहणार आहे. मागच्या




काळात आपण ५४ हजार मेगावॅटचे प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात २०३० साली ५२ टक्के वीज ही ग्रीन एनर्जीमुळे मिळणार आहे. यामुळे प्रामुख्याने उद्योगक्षेत्र व कृषिक्षेत्राला जास्त फायदा होणार असून यामुळे महाराष्ट्रात रोजगाराची निर्मिती देखील होईल. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला विशेष चालना मिळेल.

**खासकरून मुंबईचा विचार केला तर २०१४ ते २०१९ आणि मागील अडीच वर्षांत मुंबईचा चेहरामोहरा बदलला आहे. इन्फ्रामॅन म्हणून तुमची ओळख झाली. तर नव्याने मुंबईसाठी व एमएमआर क्षेत्रासाठी नेमक्या काय योजना आहेत. मुंबईकरांच्या आयुष्यात पुढील पाच वर्षांत कसा कायापालट होणार आहे?**

२०१६ साली मुंबईच्या कोणत्याही एमएमआर क्षेत्रातून दुसऱ्या एमएमआर क्षेत्रामध्ये जायला एक तासाहून कमी अवधी लागेल अशी घोषणा मी केली होती. सध्या आम्ही त्याच्यावर वेगाने काम करत आहोत. आपण बघितलं तर कोस्टल रोड झाला, वरळी-वांद्रे सी लिंक झाला, त्याच्या पुढील वांद्रे-वर्सोवा सी लिंकचे काम सुरु आहे. वर्सोवा-मढचे टेंडर दिले असून त्याचेही काम आता सुरु होईल. मढपासून विरारपर्यंतच्या सी लिंकचे कामही आम्हाला सुरु करायचे असून यासाठी जपानच्या सरकारने चाळीस हजार कोटी रुपये देण्याचे कबुल केले आहे. यामुळे मुंबईमधील ट्रॅफिक, वाहतूक समस्या कमी होण्यास नक्कीच मदत होईल. पश्चिम द्रुतगती मार्गावर या रिंगरोडमुळे होणारे ट्रॅफिक कमी होणार असून विरारपर्यंत हा रस्ता गेल्यामुळे विरार-अलिबाग कॉरिडॉरचे काम आधीच सुरू केल्यामुळे हे फायद्याचे आहे. अटल सेतुमुळे मुंबई आणि नवी मुंबईतील अंतर कमी झाले आहे. याचसोबत ३७५ किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क तयार करण्याचे कामही आम्ही सुरु केले आहे. याचा फायदा मुंबईकरांना नक्कीच होणार आहे. मुंबईकरांचे रोजचे ३ ते ४ तास प्रवासात जातात, तो वेळ वाचेल व फावला वेळ त्यांना आपल्या कुटुंबासाठी देता येईल. रस्त्याचे जाळे, उड्डाणपूल यामुळे प्रवास अधिक जलद करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबई आणि एमएमआर क्षेत्रामध्ये रहिवास ही मोठी समस्या आहे. त्यावर उपाय म्हणून व मराठी माणसाला मुंबईतच घर मिळावे यासाठी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सेल्फ री-डेव्हलपमेंटला प्राधान्य देण्यासाठी काही प्रमुख मागण्यांना मंजुरी दिली.

**विरोधक सातत्याने धारावीच्या प्रकल्पाबद्दल आक्षेप घेत आहेत. यावर तुमचे काय मत आहे?**

पहिले तर धारावी प्रकल्पाची संकल्पना राजीव गांधींच्या काळात मांडली गेली होती. त्यानंतर कोणत्याच सरकारने त्यावर काम केले नव्हते. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्या प्रकल्पाचा डीपीआर तयार केला. त्यासाठी

मोठ्या प्रमाणावर मोकळी जागा लागणार होती व ती जागा आम्ही रेल्वेकडून विकत घेतली. त्यासाठी विकासक नेमून टेंडरही भरले. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर त्यांनी ते टेंडर रद्द केले. नव्या अटी व नियम लागू करण्यात आले. आताच्या नव्याने झालेल्या टेंडर्समधील १०० टक्के नियम व अटी उद्धव ठाकरेंच्या सरकारने तयार केलेल्या आहेत. यात एक बदल करून टीडीआरचे कॅपिंग करा हे सांगितले. त्याचा डिजीटल प्लॅटफॉर्म असेल. नियमात बसणाऱ्यांना धारावीतच घर देणार असून जे नियमात बसत नाहीत, त्यांच्यासाठी रेंटल हाऊसिंग करायचे ठरले आहे.

**विरोधकांनी ईव्हीएम मशीनवर शंका घेऊन निवडणूक मतपत्रिकेवर घेण्याची मागणी केली आहे. यावर तुमचे काय म्हणणे आहे?**

तेवढ्यापुरते न बोलता मला असे वाटते विरोधकांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. एकाच दिवशी झारखंड व महाराष्ट्राचे निकाल लागले. झारखंडमध्ये ते जिंकतात तेव्हा ईव्हीएम मशीनमध्ये काहीच प्रॉब्लेम नाही. महाराष्ट्रात ते हरतात तेव्हा ईव्हीएममध्ये प्रॉब्लेम आहे. महाराष्ट्रात एकाच दिवशी लातूर शहरात अमित देशमुख जिंकतात व लातूर ग्रामीणमध्ये धीरज देशमुख हरतात. ईव्हीएमला दोष देण्याऐवजी राहुल गांधींनी जर आत्मचिंतन केले तर त्यांना नक्कीच चांगल्या जागा निवडून आणता येतील.

**गेल्या पाच वर्षात तुमच्यावर अनेकांनी वैयक्तिक पातळीवर जाऊन टीका केली. आता तुम्ही पुन्हा सरकारमध्ये आला आहात तर या सर्वांना काय उत्तर द्याल?**

पहिल्यांदा तर मी त्यांचे आभार मानतो. कारण त्यांनी जे मला सातत्याने टार्गेट केले, त्यामुळे लोकांच्या मनात माझ्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली. लोकांना असं वाटलं की माझ्याशी चुकीचं वागलं जात आहे. कारण हे इतर पक्ष व त्यांचे ट्रोलर माशी शिंकली तरी मला दोषी ठरवायचे. अतिशय असभ्य भाषेत बोलायचे. त्यामुळे साहजिकच मला लोकांची सहानुभूती मिळाली. दुसरं म्हणजे यामुळे मला लढण्याची ताकद मिळाली. लढून त्यांना त्यांची जागा दाखवायची आहे असा विश्वास तयार झाला. त्यांच्या या वागण्याचा मानसिक त्रास नक्कीच झाला, परंतु माझे कोणतेही नुकसान झाले नाही.



**महायुतीमधील तीन पक्षांना एकत्र घेऊन पुढे जातानाची कसरत कशी असणार आहे?**

गेल्या अडीच वर्षात आम्ही दाखवून दिले आहे की तीन पक्ष एकत्रितरित्या व वेगाने काम करू शकतात. आमच्यात चांगला समन्वय आहे. आम्ही ते करून दाखवू.

**भविष्यात राज ठाकरे व महायुती एकत्र येऊ शकतात का?**

लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी आम्हाला दिलेल्या पाठिंब्याचा फायदा नक्कीच झाला. महायुतीत आम्ही मुळात तीन पक्ष होतो, त्यामुळे विधानसभेत देण्यासाठी आमच्याकडे जागा नव्हत्या. इतक्या मोठ्या प्रवाहाच्या विरोधात ते लढले तरी त्यांना चांगली मते मिळाली आहेत. मला असं वाटतं की त्यांचे व आमचे विचार मोठ्या प्रमाणात सारखे आहेत. त्यामुळे त्यांना सरकारसोबत ठेवण्यात आम्हाला निश्चितपणे रस आहे. महापालिकेच्या निवडणुकीमध्ये जिथे शक्य होईल तिथे आम्ही सोबत येऊ.


**महापालिका, नगर परिषदेच्या रखडलेल्या निवडणुका आता येत्या काही दिवसात पूर्ण होतील?**

निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात यासाठी आमचा पूर्ण प्रयत्न असेल. ■

# ‘देवा’ची काठी!

● **दिनेश गुणे**, ज्येष्ठ पत्रकार

मराठीत, विशेषतः कोकणातल्या श्रद्धाळू ग्रामीण समाजजीवनात, एक म्हण आहे ‘देवाच्या काठीला आवाज नसतो!’ देवाचं सगळीकडे लक्ष असतं, आसपास घडणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींची तो दखल घेत असतो आणि त्यापैकी प्रत्येक भल्याबुऱ्या गोष्टीचा तो न्यायदेखील करत असतो, असा या श्रद्धाळू समजुतीचा अर्थ! तो, म्हणजे देव, एखाद्या चांगल्या कृतीबद्दल शाबासकीही देतो आणि वाईट गोष्ट नेमकी लक्षात ठेवून योग्य वेळ येताच त्याची शिक्षाही देतो, असे हा श्रद्धाळू समाज मानतो. देवाची ही शाबासकी किंवा शिक्षा इतकी सहज घडते, की कोणत्या एखाद्या गोष्टीची आपल्याला शाबासकी मिळाली किंवा नेमक्या कोणत्या गोष्टीची शिक्षा मिळाली हेही कोणास समजत नाही; कारण अशा शिक्षेसाठी देवाच्या हाती असलेल्या काठीचा आवाज येत नाही. कधीतरी नकळत एखादा जबर फटका बसतो, त्या जागी असह्य वेदना होतात, ‘सहन होत नाही आणि सांगताही येत नाही’ अशी अवस्था होते तेव्हा देवाने त्या काठीने आवाज न करता आपल्या कुठल्या तरी कृतीबद्दल फटका दिला अशी समजूत करून घेत निमूटपणे ही शिक्षा भोगावी अशीही या श्रद्धाळू समाजाची भावना असते.



**ज्यांचा** अशा समजुतींवर विश्वास नाही, जे देव वगैरे काही मानत नाहीत, त्यांच्याकडून जरी एखादी अप्रिय, अन्याय्य गोष्ट घडली तरी देवाची काठी आवाज न करता त्यालाही योग्य ती शिक्षा देऊन बरोबर धडा शिकवते, असेही श्रद्धाळू, भोळी माणसं मानतात. म्हणूनच आसपासच्या समाजजीवनात असे काही घडले, की त्यांचे या समजुतीवर शिक्कामोर्तब होते. देवाच्या काठीने आवाज न करता दिलेली शिक्षा या लोकाना बरोबर समजते आणि देवाच्या त्या बिनआवाजाच्या काठीचा फटका बसलेल्यांची अवस्था, ‘सहन होत नाही आणि सांगताही येत नाही’ अशी होऊन जाते. इतरांस कळणार नाही अशा छुपेपणाने दुखऱ्या जागा कुरवाळत बसायचे, चेहऱ्यावर दुःखाची रेषाही उमटू न देता निमूटपणाने वेदना सोसत, काहीच झाले नाही असा आव आणत समाजात वावरायचे हीदेखील एक शिक्षाच असते. देवाच्या काठीने आवाज न करता मारलेल्या फटक्याची ही दुहेरी शिक्षा भोगणाऱ्यांना पटो वा न पटो पण तो देवाच्या काठीचाच फटका आहे, हे भोळ्या भाविकांस मात्र माहीत असते. अशी शिक्षा भोगणारी माणसे आसपास दिसली आणि त्यांनी




चेहऱ्यावरची वेदना लपविली असली तरी या भोळ्या भाविकांसही ती लगेच ओळखू येतात. त्यांच्या वरवर हसतमुख चेहऱ्याच्या आत देवाच्या काठीच्या फटक्याने होणाऱ्या वेदना ठुसठुसत आहेत हेही त्यांना सहज कळते पण देवानेच त्यांना शिक्षा दिलेली असल्याने व 'देव अन्याय करत नाही' या समजुतीवर त्यांची श्रद्धा असल्याने, 'झाले ते योग्यच झाले' असा विचार करून शिक्षा भोगणाऱ्याकडे तशाच नजरेने पाहिले जाते.

गेल्या दोन-अडीच वर्षांत आणि त्याआधीही, म्हणजे नेमके सांगायचे झाले तर अगदी गेल्या दहा वर्षांत, महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही सुरू होते ते पाहून या श्रद्धाळू भाविकांच्या मनात एक विचार दिवसागणिक स्पष्ट होत होता. त्यांच्या मनात एक यादीही तयार होत होती आणि या यादीतल्या काहींना कधी ना कधी देवाच्या काठीचा प्रसाद मिळेल याची खात्रीही त्यांना वाटत होती पण देव कधी विनाकारण, उतावीळपणे शिक्षा करत नाही. शिक्षेसाठीही तो योग्य वेळ शोधतो. कधीकधी सुधारण्याची संधी देऊन त्यासाठी प्रतीक्षाही करतो. शिशुपाल पापी होता पण त्याचे शंभर अपराध घडेपर्यंत देवाने त्याला धडा शिकविला नव्हता. शंभर अपराधानंतर त्याच्या पापाचा घडा पुरता भरला आणि देवाने शिक्षेचे अस्त्र उगारले हे भोळ्या भाविकांस माहीत असल्याने, आताही योग्य वेळ आल्याखेरीज देवाची काठी उगारली जाणार नाही अशी त्यांचीही भावना होती. गेल्या दहा वर्षांत अनेकदा, या यादीतल्या अनेकांच्या नावावर देव खुणा करत होता. तसे संकेत त्याने कितीतरी वेळा त्या संबंधितांनाही दिले होते. 'मी कधी कुणाला त्रास देत नाही पण कुणी त्रास दिला तर त्याला सोडणारही नाही' असे या देवाने अनेकदा जाहीरपणे बजावले होते. 'पाठीत खंजीर खुपसून केलेल्या विश्वासघाताच्या गुन्ह्याला क्षमा नाही' असे सांगणाऱ्या या देवाबद्दल या भाविकांच्या मनात भक्तिभावाची भावना रुजत होती आणि अशा तऱ्हेने, महाराष्ट्राच्या राजकारणात, सामान्यांच्या मनातल्या 'देवाभाऊ' विषयीचा आदर रुजत गेला, तो बोलतो तसा वागतो, त्याला जे आवडत नाही त्याला देवाची काठी आवाज न करता शिक्षा देते, हे पटत गेले आणि देवाभाऊच्या काठीचा फटका बसलेल्यांना आता आपल्या चेहऱ्यावरच्या वेदना लपवून दुखऱ्या जागेवरची ठुसठुस सोसावी लागेल याबद्दल या भाविकांची खात्रीही होत गेली.

जवळपास दहा वर्षांपूर्वी, ३१ ऑक्टोबर २०१४ या दिवसाने महाराष्ट्रात एक इतिहास घडला. एका आगळ्या, ऐतिहासिक दिवसाच्या अनुभवाने मुंबईचे वानखेडे स्टेडियम समृद्ध झाले. याआधी त्या जागेने असंख्य वेळा गर्दी अनुभवली, उत्साह अनुभवला, जोष अनुभवला पण त्या दिवशीचा उत्साह, जोष, जल्लोष काही वेगळाच होता. महाराष्ट्राचा तरुण मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांनी ईश्वरास स्मरून शपथ घेतली, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून विशुद्धपणे आणि निस्पृहपणे काम करण्याची ग्वाही तमाम जनतेला दिली आणि खचाखच गर्दीतील जल्लोषाच्या अनुभवाने वानखेडे स्टेडियम नखशिखान्त मोहरून गेले. त्याआधी तब्बल १५ वर्षे आणि पाच वर्षांपूर्वीच्या अनैतिक राजकारणामुळे विरोधकाच्या

भूमिकेत वावरताना देवाभाऊ प्रत्येक घडामोडीची, प्रत्येक अपमानाची आणि प्रत्येक खिल्लीची नोंद घेत होते. योग्य वेळ येताच देवाची काठी आवाज न करता याची शिक्षा देणार अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची खात्री होती. म्हणूनच विरोधक म्हणून काम करताना राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या समस्यांवर आवाज उठविण्याचे, रस्त्यावर आणि विधिमंडळातही सरकारला धारेवर धरण्याचे व्रत देवाभाऊंनी निष्ठेने पूर्ण केले. याची पावती देऊन जनतेने बहाल केलेल्या नव्या सत्तेचा शकट हाकण्याची क्षमता देवाभाऊंकडे आहे, याचे असंख्य दाखले या काळात मिळाल्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर राज्याच्या नेतृत्वाची, सरकार चालविण्याची जबाबदारी पक्षाने सोपविली.

राजकारणाच्या रंगमंचावर भूमिका बदलली की प्रश्न विचारणाऱ्याच्या भूमिकेतून उत्तर देण्याच्या भूमिकेत जावे लागते. ही बदललेली भूमिका सहजपणे निभावणे सोपे नसते. प्रश्न विचारणे कदाचित सोपेही असते. उत्तर शोधणे किंवा उत्तर देणे फारच अवघड असते. विरोधकाच्या भूमिकेतून राज्यकर्त्याच्या भूमिकेत गेल्यावर होणारा हा बदल सहजपणे पेलू शकेल अशा योग्य नायकाच्या गळ्यात या भूमिकेची माळ घालणे ही पक्षाची मोठी कसोटी असते. महाराष्ट्रात तर भाजपाला सरकार चालविण्याची संधी याआधी अल्पकाळच मिळाली असल्याने, अशा भूमिकेसाठी योग्य नायक निवडणे हे आव्हान होतेच पण या जबाबदारीसाठी पक्षाने केलेली निवड सार्थ ठरविणे हे नायकासमोरील त्याहूनही खडतर आव्हान होते. आपल्या सक्षम नेतृत्वाची मोहोर उमटवून देवेंद्र फडणवीस यांनी ते आव्हान पेलण्याची क्षमता सिद्ध करून दाखविली आहे आणि महाराष्ट्राच्या आजवरच्या सुसंस्कृत राजकारणाला धक्का देऊ पाहणाऱ्या टोमणेबाजांना वेळोवेळी त्यांची जागा दाखवून देत देवाच्या काठीचा पुरेपूर प्रसाद देऊन नव्या पर्वास सामोरे जाण्याच्या नव्या आत्मविश्वासाचा मार्गही पक्षास दाखविला आहे. कधीकाळी काही मोजक्या नेत्यांच्या प्रतिमेवर महाराष्ट्रात जेमतेम राजकारण करणाऱ्या भारतीय जनता पार्टीने आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपला झेंडा रोवला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजपच्या बाजूने उभा राहिल्याने पक्षाचा आत्मविश्वास बळावला आणि कार्यकर्त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांस व 'महायुती' या नावाने एकत्र आलेल्या मित्रपक्षांच्या सामूहिक प्रयत्नास देवाच्या काठीचा मोठा आधार वाटू लागला. ही राजकारणातली देवाची काठी आहे, आपल्या पाठीशी असून विरोधकांच्या पाठीवर आवाज न करता उगारली जाणार आहे, हा महायुतीचा विश्वास त्यातूनच बळावला आहे

काही वर्षांपूर्वी एका दूरचित्रवाणी वाहिनीवर पाहिलेली देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत मला अजूनही आठवते कारण आत्मविश्वासाचे दुर्दम्य दर्शन त्या मुलाखतीतून त्यांनी घडविले होते. मित्रपक्षाचे नेते, विरोधकांमधील दिग्गजांनी सातत्याने शरसंधान सुरू ठेवल्यामुळे, चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यूसारखी फडणवीस यांची अवस्था झाली आहे, असे मुलाखतकारास वाटत होते. या नेत्याची पहिल्याच चेंडूत दांडी उडवावी अशा आविर्भावात मुलाखतकाराने तसा प्रश्न विचारला. क्षणभर त्यांनी मुलाखतकाराकडे पाहिले आणि ते म्हणाले, ''त्या अभिमन्यूला चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचे ज्ञान नव्हते. माझ्याकडे ते ज्ञान आहे. चक्रव्यूहात मला घेरणाऱ्यांना तेथेच गुरफटवून कसे ठेवायचे आणि आपण बाहेर कसे पडायचे ते मला माहीत आहे आणि मी तसे करून दाखवेन''

विधानसभा निवडणुकीतील प्रचंड महाविजयानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा अभिमन्युच्या गोष्टीचा उल्लेख केला तेव्हा या देवाच्या काठीची ताकद विरोधकांनाही नक्कीच कळली असेल. नव्या पर्वात अधिक जोमाने काम करण्यासाठी देवेंद्र फडणवीस सज्ज झाले आहेत. गेल्या दहा वर्षांत फडणवीस यांना मित्र म्हणविणाऱ्या ठाकरे परिवाराच्या पक्षाकडून असंख्य वेळा 'घरचे आहेर'देखील मिळत गेले. राजकारणात, मित्रपक्षाशी 'जुळवून घेणे' म्हणजे, मित्रपक्षांसमोर 'गुडघे टेकणे' असाच बऱ्याचदा अर्थ असतो. महाराष्ट्रात शिवसेनेसोबतच्या सुमारे तीन दशकांच्या युतीच्या काळात भाजपला अनेकदा हेच करावे लागले. मोठ्या भावाच्या ताठ्यात वर्षानुवर्षे वावरणाऱ्या या मित्राचे रुसवेफुगवे घालवून त्यांची मनधरणी करण्यासाठी अनेक केंद्रीय नेत्यांना मुंबईत धाव घ्यावी लागत असे. त्या इतिहासास आता अशी काही अलगद कलाटणी मिळाली आहे, की हे घडले कसे ते त्या इतिहासासही कळलेच नसावे. 'देवाच्या काठीचा'च हा प्रताप आहे याविषयी पक्षाच्या कार्यकर्त्यांची मात्र खातरी आहे. विरोधकांनाही ते कळले असेल पण सहन होत नसले तरी सांगता येणार नाही ही त्यांचीही अडचण आहे. ■

# फडण'वीस'...२१ !

● रघुनाथ पांडे

**इथल्या** नागरिकांनी कान फुटतील असे आरोप, टोमणे, इशारे.. पाहून घेण्याची भाषा ऐकली.

तू – मीचा लज्जास्पद एकेरी प्रयोगही झाला. खरं तर 'त्यांच्या' पूर्वजांनी आमदार-खासदार, मंत्री किंवा मुख्यमंत्री करतानाही कधी कोणाची जात नाही पाहिली. ती कधी माहीतही करून घेतली नाही. दुर्दैवाने त्यांच्या वारसांनी हिंदुत्वाच्या आडून आमचं हिंदुत्व नुसतं शेंडी-जानव्याचं नाही.. असा समाजघातकी वार करून पाहिला.

काय सुचवायचे होते त्यांना?

बुजूर्गांनी जात ठासून ठासून सांगण्याचा प्रयत्न केला. अख्खं समाजकारण जातीवर नेलं. पण महाराष्ट्रातील मायबाप जनतेने जात सरसकट नाकारली. माथी विठूचा बुक्का आणि भवतू सब्ब मंगलम् ची मनोकामना करणारा, तनामनांत शिवशंभूचा संचार असणारा हा महाराष्ट्र आहे.

'किंबहुना' ते विसरले असावेत?

म्हणूनच महाराष्ट्राने सगळे मोह, सगळे फास त्यागून 'माणूस आणि माणुसकी' निवडली.

अचुक व्यूह भेदणारा आधुनिक अभिमन्यू निवडला.

महाराष्ट्रातील सुजाण जनतेला महाभारत कळते आणि पानिपत लढाईचा अर्थसुध्दा कळतो.

' किंबहुना ' तो त्यांना कळत नव्हता.

पुढे पुढे तर त्यांनी –

महाराष्ट्र धर्मरक्षणाची ही लढाई असून अस्मिता, संस्कृती, स्वाभिमान वगैरे कणखर शब्दांची झालर चढवली.

याच वाचाळ मालिकेत एक धमकी दिली.

तारीख होती –१६ ऑगस्ट २०२४

ते म्हणाले :

लढाई लढायची तर कशी लढायची?

लढाईसाठी जिद्द पाहिजे.. ती कशी हवी..?

एकतर तू राहशील,

नाहीतर, मी राहील..!!

होऊन जाऊ...

ज्याच्या 'राहण्या- नसण्याची' भाषा 'त्यांनी' केली.



ढेकूण वगैरे म्हटले. 'ज्याच्या' मुळावर अघोरी घाव घालण्याचे प्रयत्न झाले. अनेक षडयंत्रे.. कावे, कारस्थाने रचली.

पण 'त्याचा' विश्वास ' ढळला ' नाही.. आणि तो कोणाला 'कळला'ही नाही.

तोच – तो

आज पुन्हा आला....!

आधुनिक २१ व्या शतकाचा २१ वा मुख्यमंत्री होऊन.

आणि, हो बरं आठवलं. कोणीतरी अरेरावीने म्हणालं होतं. प्रश्नच होता तो–

अकेला देवेंद्र क्या करेगा..?

उत्तर : तो पुन्हा आला.

आणि म्हणाला, बदल्याचे नाही, बदलाचे राजकारण करणार..

तो साधा सरळ सात्विक आहे. तो शपथ घेत होता; तेव्हा ऐकायला हवे होते 'त्यांनी'... डोळ्यांत क्षण आणि पापण्यांवर आनंदाश्रूचा तरंग साठवत जमलेले सारेच सहज 'त्याच्या' मागोमाग म्हणत होते – मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस...

**(लेखक मा. प्रदेश अध्यक्षांचे माध्यम प्रमुख आहेत.)**


# आता महाराष्ट्र थांबणार नाही!

● सुजय पतकी, प्रदेश प्रवक्ते

> राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी ५ डिसेंबर २०२४ रोजी शपथ घेतली त्या वेळी उपस्थितांमध्ये उत्साह होता. एका योग्य व्यक्तीला राजकीयदृष्ट्या या संपवण्यासाठी गेली पाच वर्षं जे खेळ सुरू होते, त्याला फडणवीस यांनी अभूतपूर्व यश मिळवून प्रत्युत्तर दिलं होतं. शपथविधी सोहळ्यात हिंदुत्वाचा, राष्ट्रीयत्वाचा जयघोष करणारं वातावरण होतं. यावर अर्थातच महाविकास आघाडी समर्थकांनी नाकं मुरडली, टीका केली. पण या देशातील राष्ट्रप्रेमी आणि धर्मप्रेमी नागरिकांसाठी, हा शपथविधी आझाद मैदानावर होणं हा एक काव्यगत न्यायच म्हणावं लागेल.

**११ ऑगस्ट** २०१२ रोजी मुंबईतील याच आझाद मैदानावर रोहिंग्या मुस्लिमांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात रझा अकादमीने मोर्चा काढला होता. इथे जमलेल्या जमावाने हिंसक होऊन पोलिसांवर हल्ला चढवला, महिला पोलीस अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केलं आणि राष्ट्रीयत्वाचं प्रतीक असलेल्या अमर ज्योती स्मारकाची नासधूस केली. तेव्हा रझा अकादमीला पाठीशी घालणारं काँग्रेस-राष्ट्रवादीचं सरकार होतं. अशा या मैदानावर बरोबर १२ वर्षांनी राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करणाऱ्या भाजप सरकारने शपथ घ्यावी हा काव्यगत न्याय नाही तर काय?

१९९९-२०१४ या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारच्या काळात महाराष्ट्रातील जनतेची अवस्था त्राही



माम् अशी झाली होती. राज्यात सर्रास दंगली होत, अतिरेकी हल्ले होत, पायाभूत प्रकल्प सुरू होत नव्हते, भ्रष्टाचाराने तर कळस गाठला होता. दिवसाला सरासरी १० शेतकरी आत्महत्या होत होत्या, राज्याचा जीडीपी वर्षागणिक घसरत होता. राज्याच्या तिजोरीत भ्रष्टाचाराने इतका मोठा खड्डा करून ठेवला होता की येणाऱ्या नवीन सरकारला कर्मचाऱ्यांचे पगार देणंदेखील कठीण असेल अशा अवस्थेत राज्य आणून सोडलं होतं.

देशातील जनतेने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने केंद्रात नरेंद्र मोदींचं सरकार निवडून दिलं. तेव्हा राज्यात शिवसेनेची भाजपशी युती होती, पण ती मोडून शिवसेनेने स्वबळावर निवडणूक लढवायचा निर्णय घेतला. त्यामुळे १९८९ नंतर पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली. भाजपचे १२२ आमदार निवडून आले आणि शिवसेनेचे ६५. शिवसेनेने सरकारमध्ये सामील व्हावं अशी भाजपची इच्छा होती, पण शिवसेनेने जवळपास एक महिना थयथयाट करून शेवटी सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. या सरकारचे मुख्यमंत्री होते देवेंद्र फडणवीस.

तोपर्यंत महाराष्ट्राला अभ्यासू संसदपटू, उत्तम वक्ता आणि उत्तम प्रवक्ता म्हणून देवेंद्र फडणवीस परिचित होते. ते नवखे आहेत त्यामुळे त्यांना आपण जेरीस आणू अशा वल्गना सत्तेतून पायउतार झालेल्या आघाडीतील बड्या

नेत्यांनी खासगीत केल्या होत्या. पण फडणवीस यांचा महाराष्ट्रातील प्रश्नांचा प्रचंड अभ्यास असल्यामुळे सत्तेत येताच त्यांनी आपली प्रशासकीय चुणूक दाखवण्यास सुरुवात केली. त्यांनी 'जलयुक्त शिवार' योजना आणली. ५ वर्षांत जवळपास १६ हजार गावांना त्याचा फायदा झाला. सुमारे ११ लक्ष हेक्टर जमीन ओलिताखाली आली. 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत सुमारे ३.२३ कोटी मेट्रिक टन गाळ बाहेर काढला. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांचं आयुष्यच बदलून गेलं. 'मागेल त्या शेततळं' ही योजना तर इतकी लोकप्रिय झाली की, या योजनेचा गौरव पंतप्रधान कार्यालयाने केला. २०१७ साली शेतकऱ्यांचं दीड लाख रुपयांपर्यंतच कर्ज माफ करण्यात आलं. ज्यामुळे जवळपास ३४ हजार २२ कोटी रुपयांची कर्जं माफ झाली. त्यांच्या सत्ताकाळात 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'तून आवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना जवळपास २७०० कोटी रुपयांची भरपाई दिली गेली. राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये हवामानाचा अंदाज वर्तवणारं 'महावेध' हे सॉफ्टवेअर बसवण्यात आलं. आदिवासींमधली कुपोषण दूर करण्यासाठी 'डॉ. एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना' सुरू झाली.

लोकसहभाग आणि औद्योगिक विश्वाचं भरभरून योगदान हे त्यांच्या कार्यकाळाचं वैशिष्ट्य! २०१६ च्या दुष्काळ निवारणासाठी फडणवीस यांनी अविश्रांत मेहनत घेतली. 'नाम फाउंडेशन', 'पाणी फाउंडेशन' यांसारख्या संस्थांनी पुढाकार घेतला. सरकारने हजारो चारा छावण्या उभारल्या. दोन रुपये किलो दराने तांदूळ आणि तीन रुपये किलो दराने गहू उपलब्ध करून दिला. रोजगार हमी योजनेतून कामांचा सपाटा लावला. या काळात भारतीय औद्योगिक विश्वातील अनेक मातब्बर कंपन्यांनी त्यांचा सीएसआर निधी दिला. मायक्रोसॉफ्टचे तत्कालीन सीईओ सत्या नडेला आणि त्यांच्यासारख्याच तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणींशी संवाद साधून त्यांनी महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासनाचं प्रारूप तयार केलं. सेवा हमी कायदा आणून राज्यातील जवळपास ३२९ सेवा डिजिटल केल्या. त्यातील भ्रष्टाचार कायमचा थांबवला. परदेशी गुंतवणुकीचे जवळपास पाच अब्ज डॉलर्सचे करार या पाच वर्षांत झाले. मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाची कल्पना याच सरकारच्या काळात मांडली गेली आणि प्रकल्प पूर्णही करण्यात आला. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबईत सागरी मार्ग उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली. मुंबई, पुणे, नागपूर येथे महत्त्वाकांक्षी मेट्रो प्रकल्प सुरू झाले. काँग्रेस–राष्ट्रवादीच्या काळात उभारलेले अनेक टोलनाके ही स्थानिक नेत्यांच्या अर्थकारणाची सोय होती, असे ६५ टोलनाके बंद केले. केंद्र सरकारच्या योजना राज्यात प्रभावीपणे राबवल्या. परिणामी, राज्याच्या जीडीपी वाढत गेला. २०१३–१४ ला राज्याचा जीडीपी होता १६,४९,६४७ कोटी तो २०१९–२० मध्ये २६,५६,८०६ कोटी रुपयांवर पोहोचला.

अर्थात हा सगळा प्रवास सुखेनैव सुरू होता असं नाही. एखाद्या समाजाला आरक्षणावरून भडकव, कधी फडणवीस यांना जातीवरून हिणव असे प्रकार सुरू होते. ज्या पक्षाशी युती होती, त्या शिवसेनेनेही सरकारमध्येच राहून जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत हे रोज सरकारवर टीका करत. आमचे मंत्री राजीनामे खिशात घेऊन फिरतात, अशी धमकी देत. सामना मुखपत्रातून स्वतःच्या सरकारवर टीका करत. उद्धव ठाकरेंची भूमिका शब्दशः घरभेद्याचीच होती. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपचे ८२ नगरसेवक निवडून आले, तर शिवसेनेचे ८४. २०१७ च्या महापालिका निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरेंनी खालच्या पातळीवर येऊन भाजपवर, देवेंद्र फडणवीस यांच्यावर आणि नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर टीका केली होती. नगरसेवकांची जुळवाजुळव करून मुंबईत भारतीय जनता पक्षाचा महापौर बसवणं शक्य होतं, पण युतीचा धर्म पाळून आणि उद्धव ठाकरेंच्या इच्छेचा मान राखून त्यांनी शिवसेनेचा महापौर होऊ दिला. तरीही शिवसेनेने सरकारला त्रास देणं सुरूच ठेवलं.

२०१९ ला लोकसभेत पुन्हा एकदा भाजप प्रचंड बहुमताने निवडून आला. इथे राज्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी 'महाजानदेश यात्रा' काढली. हा जनादेश ते केवळ भाजपसाठी नव्हे, तर युतीसाठी मागत होते. पुढचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत, असं अमित शहा आणि नरेंद्र मोदी सभांमध्ये सांगत होते. अनेक सभांना स्वतः उद्धव ठाकरे उपस्थित होते. भाजपचे १०५ आमदार निवडून आले, तर शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले. थोडक्यात पुन्हा युतीचं सरकार येणार हे प्रत्येकालाच वाटत होतं, पण उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षांच्या




मुख्यमंत्रीपदाचं आश्वासन अमित शहा यांनी दिल्याची आवई उठवली. आणि पुढे भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला. ज्या काँग्रेसच्या विरोधात बाळासाहेब ठाकरेंनी आयुष्यभर संघर्ष केला, त्याच काँग्रेससोबत सरकार स्थापन करून स्वत: मुख्यमंत्रीपद मिळवलं. मुळात काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना अशी अभद्र युती. त्यात कोविडने जगभर थैमान घातलं होतं, कुठलाही प्रशासकीय अनुभव नाही आणि काहीही शिकून घ्यायची इच्छा नाही आणि घराच्या दिवाणखान्यातून सरकार चालवायची इच्छा अशा व्यक्तीच्या हातात महाराष्ट्रासारखं संपन्न राज्य अडकलं होतं. फडणवीस विरोधी पक्ष नेते म्हणून सरकारला सतत रास्त प्रश्न विचारत राहिले. अधिवेशन आलं की पोटात गोळा येतो, कारण फडणवीस कोणता दारूगोळा घेऊन येतील याची भीती सतत मनात असते, असे महाविकास आघाडीतील नेते खासगीत मान्य करत. अडीच वर्षांत उद्धव ठाकरेंनी राज्य १० वर्षं मागे नेलं. पुढे त्यांच्या छळाला कंटाळून एकनाथ शिंदे आणि ४० आमदारांनी शिवसेना सोडली व भाजपसोबत सरकार स्थापन केलं. भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने उपमुख्यमंत्रीपद स्वीकारलं. संयम आणि पक्षशिस्तीचं हे उदाहरण देशाने अनुभवलं. महाराष्ट्र पुन्हा प्रगतीच्या वाटेवर धावू लागला. मात्र मराठा आरक्षणावरून फडणवीस यांना अडचणीत आणण्यास सुरुवात झाली. त्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला फारसं यश न मिळाल्यामुळे रोख फडणवीस यांच्याकडे वळला. पण पुढच्या चार महिन्यांत त्यांनी प्रत्येक मतदारसंघ पिंजून काढला. पक्ष रचना, निवडणूक व्यवस्थापन, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांच्या लाभार्थींचे मेळावे यावर लक्ष केंद्रित केलं. विचार परिवारातील संघटनांशी समन्वय साधला. विरोधक जितं मया भावनेत रमले होते तेव्हा फडणवीस यांनी महाराष्ट्रभर प्रवास करून महाराष्ट्राच्या प्रगतीचा आराखडा जनतेसमोर मांडला. शेवटी सत्य असत्याच्या लढाईत विजय सत्याचाच झाला. २३ नोव्हेंबर २०२४ ला महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली. राज्यात सलग तिसऱ्यांदा भाजपचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आले. महायुती २३९ तर महाविकास आघाडी केवळ ४६ जागांवर विजयी झाली. महाराष्ट्राचा फडणवीस यांच्यावरील दृढ विश्वास पुन्हा एकदा सिद्ध झाला.

आज पुन्हा देवेंद्र पर्व ३.०ची सुरुवात झाली आहे. जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आणि आभासी विश्वाच्या दिशेने निघालेलं असताना, बांधा–शिवारातील शेतकऱ्यापासून ते जग कवेत घेण्याची स्वप्न पाहणाऱ्या तरुण पिढीच्या, माता– भगिनींच्या स्वप्नांना आकार देण्याचं सामर्थ्य देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही, हे केवळ घोषवाक्य राहणार नाही तर ते वास्तवात उतरेल हे नक्की. ■

# राजकारणाचा चक्रव्यूह भेदणारे आधुनिक अभिमन्यू

● **रामकिशन रौंदळे**, प्रदेश कार्यकारणी सदस्य

> महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत विविध आंदोलनाच्या माध्यमातून परिस्थिती स्फोटक बनलेली होती. या राजकीय धुमश्चक्रीत देवेंद्रजी फडणवीस यांना पद्धतशीरपणे चक्रव्यूहात अडकवण्याचा प्रयत्न केला जात होता. असे असताना महाराष्ट्रात देवेंद्रजी यांच्याच नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाला जे दैदीप्यमान यश मिळाले ते अपूर्व आहे. कितीही डावपेच करून देवेंद्रजींना चक्रव्यूहात अडकवण्याचा, त्यांना खलनायक म्हणून उभे करण्याचा प्रयत्न झाला असला तरी अशा प्रकारची सगळी कारस्थाने त्यांनी उधळून लावली.

**आपण** चक्रव्यूह भेदणारे अभिमन्यू आहोत हे त्यांनी आपल्या अफाट कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले. खोटेनाटे आरोप करून देवेंद्रजी यांची प्रतिमा मलिन करण्याचा, त्यांच्या प्रतिमेवर शिंतोडे उडवण्याचा तसेच त्यांना घेरण्याचा अयशस्वी प्रयत्न विरोधकांनी केला पण महाराष्ट्राच्या जनतेच्या विश्वासावर देवेंद्रजी यांनी अशा सगळ्या षड्यंत्र आणि कपटकारस्थानांना धूळ चारली. सामाजिकदृष्ट्या संवेदनशील परिस्थितीत अत्यंत प्रगल्भपणे, संयमाने आणि समाजातल्या शेवटच्या



माणसाच्या हृदयसिंहासनावर विराजमान होऊन देवेंद्रजी यांनी हे यश मिळवले. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात त्यांचे हे यश सोनेरी अक्षरांनी लिहिले जाईल.

आतापर्यंतच्या इतिहासात महाराष्ट्राला अनेक मुख्यमंत्री मिळाले पण मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय देवेंद्रजींनीच आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात घेतला. केवळ हा निर्णय घेऊन ते थांबले नाहीत तर हे आरक्षण त्यांनी उच्च न्यायालयात टिकवले. मराठा आरक्षण कायद्याच्या चौकटीत बसवून मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केवळ त्यांनीच केला, हे विरोधकांनाही मान्य करावे लागेल. भलेही त्यांच्यावर द्वेषबुद्धीने टीका झाली, त्यांची जात काढण्यात आली. त्यांच्या कुटुंबावर खालच्या पातळीवर जाऊन व्यक्तिगत हल्ले करण्याचा प्रयत्न झाला तरीही अत्यंत धीराने सर्व परिस्थितीला ते सामोरे गेले. देवेंद्रजी हे संपूर्ण समाजाला सोबत घेऊन चालणारे नेते

आहेत. पोलीस भरतीत मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय असो अथवा सारथीची निर्मिती करून मराठा समाजातील उच्चशिक्षितांना अधिकारी पदावर नेण्याचे त्यांचे व्हिजन असो. मराठा समाजासाठी आजवर त्यांनी जे केले ते आतापर्यंत कोणीही केले नाही. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून ८४०० कोटीपेक्षा जास्त कर्ज वितरित करून मराठा समाजातले तब्बल एक लाख उद्योजक घडविण्याचे क्रांतिकारी पाऊल देवेंद्रजींनीच उचलले.

देवेंद्रजी मुख्यमंत्री असताना राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच इतर मागासवर्गीयांच्या ओबीसी कल्याणासाठी स्वतंत्र खात्याची निर्मिती करण्यात आली. महायुतीच्या सरकारमध्ये शेवटच्या कालावधीत ओबीसीमधील विविध समाजाच्या कल्याणासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली. वेगवेगळ्या समाजघटकांसाठी थोडी थोडकी नव्हे तर १७ आर्थिक विकास महामंडळे त्यांनी निर्माण केली. मायक्रो ओबीसीनाही सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत त्यांनी सहभागी करून घेतले. सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत समाजातला छोटा छोटा घटकही दुर्लक्षित राहू नये हाच विचार यामागे देवेंद्रजींनी केला. समाजातल्या सर्व घटकांना सोबत घेऊन तसेच विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाचे काम त्यांनी केले आहे. ओबीसी विकासासाठीची तरतूद साडेचार हजार कोटी वरून साडेआठ हजार कोटी पर्यंत नेण्याचा निर्णय तसेच ओबीसीसाठी दहा लाख घरकुले उभारण्याचा संकल्प यातून देवेंद्रजींची दूरदृष्टी आणि समाजातल्या उपेक्षित, वंचितांच्या कल्याणाबद्दलची तळमळ दिसून येते.

भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता विविध योजना अमलात आणण्याचे काम देवेंद्रजी मुख्यमंत्री असतानाच प्राधान्याने झाले. राजे यशवंतराव होळकर महामेष योजना व इतरही योजनांच्या माध्यमातून भटक्या विमुक्तांना खऱ्या अर्थाने त्यांनीच न्याय दिला. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर समाजात फूट पाडण्याचे तसेच वेगवेगळ्या समाज घटकात कलह निर्माण करण्याचे आणि जाती जातीत भांडणे लावून सत्तेची पोळी भाजण्याचे उद्योग काहींनी केले. महाराष्ट्रातले सामाजिक वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न झाले पण अशा काळातही देवेंद्रजींनी एखाद्या कुशल



सेनापतीप्रमाणे सर्व परिस्थिती हाताळली. राज्यातला सामाजिक सलोखा बिघडणार नाही याची खबरदारी त्यांनी गृहमंत्री असताना घेतली. सर्व समाजांना सोबत घेऊन खऱ्या अर्थाने सबका साथ सबका विकास हे सूत्र राबवले.


भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभा निवडणुकीत पायाला भिंगरी लावून संपूर्ण महाराष्ट्र पालथा घातला. भाजपच्या शेवटच्या कार्यकर्त्यांपर्यंत ते संवाद करत राहिले. निवडणुकीतील भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा पुरेपूर उपयोग करून या ताकदीला ऊर्जा पुरवण्याचे काम त्यांनी केले. पक्षाच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांपासून ते अगदी पन्ना प्रमुखापर्यंत त्यांनी पक्की बांधणी केली.

देवेंद्रजींच्या व्हिजनला चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भक्कम अशी संघटनात्मक साथ पक्षासाठी उपयुक्त ठरली. देवेंद्रजींनी विकासाचे, प्रगतीचे व्हिजन वास्तवात उतरवले. त्यांच्यावर विरोधकांनी केलेले सर्व हल्ले त्यांनी परतवून तर लावलेच पण महाराष्ट्रात कोणत्याही फाटाफुटीच्या, सामाजिक विद्वेषाच्या षड्यंत्राला थारा नाही हे त्यांनी दाखवून दिले. इतिहासातला अभिमन्यू चक्रव्यूहात अडकला पण चौफेर कर्तृत्वाच्या माध्यमातून देवेंद्रजी हे चक्रव्यूह भेदणारे आधुनिक अभिमन्यू ठरले. भारतीय जनता पक्षाला राज्यात सर्वोच्चस्थानी यश प्राप्त करून देणाऱ्या देवेंद्रजींचे अभिनंदन. ■

# नेतृत्वाचा विलक्षण प्रवास




मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस... शपथ घेतो की... आझाद मैदानावर ५ डिसेंबर रोजी हा आवाज घुमला. या आवाजाच्या मागे होता तो गेल्या पाच वर्षांतील संघर्ष, त्याग आणि मेहनतही. 'बूथप्रमुख' ते 'महाराष्ट्राचा मुख्यमंत्री' आणि आता 'पुन्हा मुख्यमंत्री' असा देवेंद्र यांचा विलक्षण प्रवास राहिला आहे. वडील दिवंगत गंगाधरराव यांच्या कर्तव्यनिष्ठ आणि पारदर्शी राजकारणाचा वारसा चालवताना त्यांचे सर्वसमावेशक असे नेतृत्व घडत गेले. गेल्या काही वर्षांतील संघर्ष, त्याग आणि त्यातून झालेला संकोच हे सगळे सहन करत फडणवीस पुढे गेले. त्यांचा अभिमन्यू करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला; पण ते चक्रव्यूहातून सहीसलामत बाहेर पडले. परिस्थितीने कठोर परीक्षा घेतली; पण अपार पक्षनिष्ठा, प्रचंड आत्मविश्वास आणि राजकीय डावपेचांमध्ये भल्याभल्यांना चीत करण्याची क्षमता या आधारे ते वाटचाल करीत राहिले. २०१४ ते २०१९ या काळात त्यांनी राज्याला एक सक्षम नेतृत्व दिले, पायाभूत सुविधांपासून सामान्य माणसांशी निगडित अनेक निर्णयांना त्यांनी गती दिली.



**'जलयुक्त शिवार'** ही अभिनव योजना आणली. भाजपाचा यावेळच्या दमदार, शानदार विजयाचे सिंचनही त्यांचेच. त्यांच्या कुशल नेतृत्वातच हा देदीप्यमान विजय मिळाला. भाजपाला महायुतीमध्ये १३२ जागा मिळाल्या असताना त्यांच्याकडेच राज्याचे नेतृत्व जाणार हे स्पष्ट झाले होते. आमदारांसह सर्वसामान्य भाजपा कार्यकर्त्यांच्या मनातही मुख्यमंत्रिपदासाठी देवाभाऊंचेच नाव होते. ऐनवेळी भलतेच नाव समोर येईल, असा तर्क काहींनी दिला होता. त्यासाठी राजस्थान, मध्य प्रदेशची उदाहरणे दिली जात होती; पण जनभावनेचा आदर राखत भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वानेही असे धक्कातंत्र महाराष्ट्रात न वापरता फडणवीस यांच्याच नावाला पसंती दिली.

कार्यकर्त्यांच्या मनातील धाकधुकीची जागा आता आनंदाने घेतली. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र यांचे बोट धरून त्यांना मुख्यमंत्री केले, यावेळीही 'देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र' हे सूत्र भाजपाने स्वीकारले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांनी प्रभावित असलेला आणि त्यांच्या पदचिन्हांवर चालणारा हा नेता महाराष्ट्राची सूत्रेह पाच वर्षांसाठी सांभाळणार आहे. राज्याशी संबंधित सामाजिक, आर्थिक, औद्योगिक विषयांचा फडणवीस यांचा गाढा अभ्यास आहे. त्यांच्यातील दूरदृष्टीचा परिचय त्यांनी या आधीच अनेक प्रसंगांमध्ये दिलेला आहे. आता तर त्यांच्या गाठीशी गेल्या काही वर्षांमधील चढउतारांचे चांगले-वाईट अनुभवदेखील आहेत. आपल्यातील नेतृत्वगुणांचा लाभ ते महाराष्ट्राला नक्कीच मिळवून देतील, अशी अपेक्षा आहे.

एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षे 'जनतेचा मुख्यमंत्री' अशी स्वतःची प्रतिमा निश्चितच तयार केली. 'मी सीएम म्हणजे चीफ मिनिस्टर नाही तर कॉमन मॅन आहे', असे ते म्हणत. लाडक्या बहिणीसह अनेक लोकाभिमुख निर्णय त्यांनी घेतले आणि त्यांना लोकप्रियताही मिळाली. सर्वसामान्यांच्या हिताचे धडाकेबाज निर्णय घेणारे मुख्यमंत्री म्हणून जनसामान्यांचे प्रेमही त्यांना मिळाले. आता तेच प्रेम टिकविण्याचे आणि वृद्धिंगत करण्याचे आव्हान फडणवीस यांच्यासमोर असेल. आधी शिंदे-फडणवीस-अजित पवार असा क्रम होता, आता तो फडणवीस-शिंदे-अजित पवार असा असेल एवढाच काय तो फरक. अडीच वर्षांच्या काळात शिंदे यांनी आपल्या दोन सहकारी उपमुख्यमंत्र्यांचा योग्य सन्मान राखत कारभार केला; आता ती जबाबदारी फडणवीस यांची असेल. फडणवीस यांच्या रूपाने एक सुसंस्कृत नेतृत्व महाराष्ट्राला मिळत आहे. सुसंस्कृतपणा आणि संस्कृती या एकमेकांच्या हातात हात घालून चालणाऱ्या बाबी. राज्याच्या राजकीय संस्कृतीचा स्तर गेल्या काही वर्षांमध्ये फारच बिघडला आहे. पातळी सोडून होणारे आरोप, बडबोल्या नेत्यांची गर्दी, एकमेकांचे चारित्र्यहनन, किळसवाणी भाषा महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला साजेशी नव्हतीच. एकूणच राजकीय गढूळपणा इतका वाढलेला असताना फडणवीस यांनी सुसंस्कृतपणाची तुरटी त्यात फिरवावी, त्यासाठी विरोधकांनाही विश्वासात घ्यावे, अशी अपेक्षा आहे. ■

# महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्नशील




**महाराष्ट्र** औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अग्रेसर राहील यादृष्टीने नियोजन करुन विकासाचा वेग वाढविण्यावर भर राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मंत्रालयातील मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर कक्षात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार अतुल सावे, संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, सचिव प्रवीण पुरो, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते.

देशात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य राहील यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करून विकासाचा वेग वाढविण्यात येईल. मागील अडीच वर्षांत राज्य शासनाने घेतलेले विविध निर्णय कायम राहतील. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसह अन्य योजना सुरूच राहतील. त्यांची आगामी काळात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच राज्य शासनाने मागील काळात दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसाठी बांधील असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील सिंचनाचे प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतील. त्यात नदी जोड प्रकल्पाचे काम सुरू करण्यावर भर राहील. सन २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील. राज्यातील जनतेच्या आमच्या सरकारकडून असलेल्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न केले जातील. समृद्धी महामार्गामुळे जालना व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यात उद्योग व्यवसाय वाढण्यास मदत होत आहे. याच धर्तीवर शक्तीपीठ मार्गासाठी संबंधित भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्ग काढण्यात येईल. राज्यात अधिकाधिक उद्योग येण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अनेक उद्योगांशी चर्चा सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. हे उद्योग राज्यात आल्यानंतर रोजगार निश्चित वाढेल. मागील वर्षभरात राज्यात थेट परकीय गुंतवणुकीपैकी ९० टक्के गुंतवणूक केवळ मागील सहा महिन्यात आली आहे.

हा वेग असाच कायम राहील, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या शक्ती कायद्याबाबत केंद्र सरकारशी संवाद साधण्यात येईल. शेतकरी कर्जमाफीबाबत केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. ■

## लाडक्या बहिणींनी केले औक्षण आणि अभिनंदन



**अलोट** जनसागराच्या साक्षीने मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पदभार स्वीकारण्यापूर्वी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मंत्रालयात राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या महापुरुषांना अभिवादन केले. दरम्यान मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे मंत्रालयात आगमन झाल्यावर लाडक्या बहीणींनी औक्षण करून अभिनंदन केले. वैष्णवी जितेंद्र खामकर, मनाली महेश नारकर, शारदा शरद कदम, प्राची प्रफुल्ल पवार, रेखा शेमशोन आढाव या लाडक्या बहिणींनी त्यांचे औक्षण केले तर लिलाबाई चव्हाण व श्रीमती रेणुका राठोड यांनी पुष्पगुच्छ देवून प्रातिनिधीक स्वरूपात राज्यातील लाडक्या बहिणींच्या वतीने अभिनंदन केले.

## पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर, पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत

**मुख्यमंत्रीपदाची** शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.



# शब्दाला जागणारा नेता



कोपर्डी (जि. अहिल्यानगर) येथे ८ वर्षांपूर्वी एक दुर्दैवी घटना घडली होती. देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळी मुख्यमंत्री म्हणून पीडित कुटुंबियांशी संवाद साधला होता. कुटुंबियांनी पीडितेच्या बहिणीच्या लग्नाबद्दल चिंता व्यक्त केली. तेव्हाच तिच्या लग्नाची जबाबदारी मी घेतो आणि त्या लग्नालाही मी आवर्जून येईन, असा शब्द दिला होता. पीडितेच्या बहिणीचा विवाह नुकताच झाला. त्यावेळी दिलेला शब्द लक्षात ठेवत नूतन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या लग्नसोहळ्याला हजेरी लावून वधू-वरांना आशिर्वाद दिले. **नेता असावा तर असा, दिलेला शब्द पाळणारा!**





शपथविधीपूर्वी राज्य माता गोमातेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सागर' या शासकीय निवासस्थानी विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय) माधव भांडारी, संदीप गिड्डे-पाटील, माधव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# पराभवानंतरची रडारड



● विनय जोशी

> २०१४ चे लोकसभा निकाल लागून मोदी पूर्ण बहुमतात सत्तेवर आले आणि त्यांनतर वर्षभर समस्त डावी पुरोगामी डापु गँग वेदना, भ्रम, दुःख, शोक, धक्का अशा संमिश्र भावनांनी विव्हळत होती. निकालानंतर शरद पवार म्हणाले होते, निकाल धक्कादायक आहेत, पण आपण एकमेकांना धरून राहिलं पाहिजे आणि आधार दिला पाहिजे.

**उर्दू** पेपरमधून मुस्लिम पत्रकार म्हणत होते, ही काळरात्र कमीत कमी १० वर्षं तरी टिकेल, मुस्लिमांनी त्यासाठी मानसिक तयारी ठेवावी!

काँग्रेस, डावे म्हणत होते, मोदी खोटी स्वप्ने जनतेला विकण्यात यशस्वी झाला पण जनता लवकरच भानावर येईल!

ज्या विदेशी पत्रकारांनी मोदी, भाजप, हिंदुत्व यावर कित्येक वर्षं रान माजवलं होतं ते याची खरी, खोटी कारणं शोधण्यात दंग होते!

आत्ता याची आठवण होण्याचं कारण महाराष्ट्र विधानसभेचे निकाल!

१९९० विधानसभा निवडणुकीत काँग्रेस १४१ जागा जिंकून राज्यात सत्तेत आली तेव्हापासून २०१४ निवडणुकीत भाजपने १२३ जागा जिंकेपर्यंत मधल्या २४ वर्षात एकदाही कोणत्याही पक्षाला १०० पार करता आले नव्हते. भाजपने सलग ३ वेळा १०० पार केलेत!

मागच्या वेळी १०५ घरी बसवले वगैरे पुरोगामी माज दाखवत अडीच वर्षं ओरबाडलेल्या सतेची मस्ती साफ उतरली, जनमताचा अनादर करणारे दोन पक्ष चिन्हं गमावून बसले आणि त्याला फुस देणारी काँग्रेस आज बाराच्या भावात गेलेली आहे!

पुरोगामी महाराष्ट्रात भाजप सारखा जातीयवादी पक्ष वाढणार नाही, भाजप जिंकली तर लोकशाही, संविधान धोक्यात येईल वगैरे त्याच त्याच कालबाह्य आरोपांना साफ झिडकारून आज भाजपने दिमाखात आपला मुख्यमंत्री बिनडोक पुरोगाम्यांच्या माथ्यावर बसवलेला आहे. तो ही असा माणूस मुख्यमंत्री झाला ज्याच्या शारीरिक, जातीगत, वैयक्तिक, कौटुंबिक अशा मिळेल त्या गोष्टीवर मराठी डाव्या पुरोगामी डापु गँगचे मान्यवर नेते, कार्यकर्ते निर्लज्जपणे अहोरात्र तुटून पडत होते.

पुरोगामी महाराष्ट्रात लोकशाही आणि संविधान वाचविण्याच्या नावाखाली मराठा आरक्षण निमित्ताने एक

नवा हिरो निर्माण केला गेला! त्याला अर्वाच्च शिवीगाळ करण्याचा परवाना पुरोगामी नेत्यांनी देऊन टाकला; त्याची बीभत्स शिवीगाळ जनतेला दाखवण्याची व्यवस्था बेशरम मराठी मीडिया, पत्रकारांनी केली आणि ह्याचा परिणाम आपण २३ नोव्हेंबरला बघितलाय!

भाजप महायुतीच्या प्रचंड विजयाच्या मागे या डापु गँगची भूमिका फार मोठी आहे. या गँगने महाराष्ट्रातील जनतेला उघड उघड जातीयवाद करायला शिकवला, महिलांवर गलिच्छ टिप्पण्या करणं न्यू नॉर्मल प्रकारात टाकलं, जनतेला ज्या गोष्टींची जराही भीती वाटत नाही अशा गोष्टींचा म्हणजे संविधान, लोकशाही धोक्यात वगैरे बाऊ करून दाखवला, याच गँगमुळे सज्जाद नोमानी सारख्या जिहाद्याने थेट भाजपला हरवण्याचं केलेलं आवाहन लोकशाही वाचविण्याच्या प्रयत्नाचा भाग आहे असं जनतेला सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करुन बघितला! आणि या सगळ्यात डापु गँगने तीन पक्ष भुईसपाट करण्यात मोठी भूमिका बजावली!

उद्धव ठाकरेंची दंगल माफी हा तर डापु गँगचा सगळ्यात मोठा कारनामा होता! मतदानाला तीन दिवस बाकी असताना पुरोगामी पब्लिकने उद्धव ठाकरे यांनी १९९२ च्या दंगलीत शिवसेनेच्या सहभागाबद्दल माफी मागितली ही बातमी पसरवली जेणेकरून मुस्लिम मते मोठ्या संख्येने महा विकास आघाडीच्या झोळीत पडतील, पण याचा भयानक परिणाम खुद्द उद्धव सह सहयोगी पक्षांना भोगावा लागला. ज्ञानेश महाराव टाईप लोकांनी हिंदू संतांना केलेली शिवीगाळ आणि वक्फ बोर्डाच्या चोऱ्या, मुस्लिमांची चार लग्न, तीन तलाक, बुरके याचं शरद पवारांच्या उपस्थितीत केलेलं समर्थन याचाही भाजपच्या विजयात मोठा वाटा आहेच!

ईव्हीएम हेच आता मराठी डापु गँगसाठी नवीन बामण!

इतके सगळे प्रयत्न, ट्रिक वापरूनही, अख्खा मराठी मीडियाने दिवसरात्र मेहनत घेऊनही पुरोगामी महाराष्ट्रात हिंदुत्ववादी भाजप जिंकली याचा धक्का मोठा जीवघेणा आहे! आता याबद्दल शिव्या कुणाला देणार? रोज रडायचं म्हणजे एक मजबूत बागुलबुवा हवाच! आता बामणाना शिव्या देऊन उपयोग नाही कारण राज्यात भाजपा बहुजन लोकांचा पक्ष आहे त्यामुळे सध्या ईव्हीएम हेच नवीन बामण आहेत!

महाराष्ट्र भाजप फक्त बामणी पक्ष आहे आणि महा विकास आघाडी यावेळी १६५ जागा जिंकेल म्हणणारा एक पुरोगामी आणि त्याचे सगळे साथीदार २३ पासून रोज ईव्हीएमला शिव्या शाप देणाऱ्या पाच पन्नास पोष्टी पाडत आहेत! आपण उचललेले विषय आणि एजेंडा सामान्य जनतेला भावत नाही, त्यांच्या चिंता आणि एजेंडा वेगळा आहे हेच मुळी यांना कळेना! त्यामुळे सध्या ईव्हीएमवर राग काढणे हाच एकमेव उपाय आहे, तो ते नित्यनेमाने करत आहेत! राजीव गांधी आणि पत्रकार अरुण शौरी यांच्यात सुप्रसिद्ध वाद झाला होता, शौरी गांधींना रोज एक प्रश्न विचारत होते तेव्हा राजीव गांधी चिडून म्हटलं भुंकणाऱ्या प्रत्येक कुत्र्याला उत्तर द्यायला मी जबाबदार आहे का?; त्यावर अरुण शौरी म्हणाले, I've never seen such a knowledge proof man like Rajiv Gandhi in my whole life!

(माझ्या उभ्या आयुष्यात आपल्या डोक्यात ज्ञान शिरणार नाही याची राजीव गांधी एवढी काटेकोर काळजी घेणारा मनुष्य माझ्या पाहण्यात आलेला नाही!)

मराठी बिनडोक पुरोगामी लोकांची आजची केविलवाणी अवस्था बघून अरुण शौरी यांचं हे वाक्य परत परत आठवत राहतं! ■

श्री. शरद पवार साहेब,
आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका.
जास्त मतं मिळूनही कमी जागा कशा?
चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, भाजपाला मतं १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण काँग्रेसला मतं ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मतं आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मतं आणि ८ जागा.
२०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मतं होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मतं होती आणि जागा ४ आल्या.
पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे.

**■ देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# 'ईव्हीएम'चा बहाणा

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीने भरघोस यश मिळवले आणि अपेक्षेप्रमाणे ईव्हीएमच्या नांवाने खडे फोडणे चालू झाले. निवडणूकीपूर्वी महायुतीचे संख्याबळ हे २०५ एवढे होते (भाजप १०५ व समर्थक १०, एकनाथ शिंदे शिवसेना ४१ आणि ९ अपक्ष, अजित पवार राष्ट्रवादी ४०) असे हे २०५ चे संख्याबळ भगव्या लाटेमुळे वाढून २३२ वर पोहोचले. उलट पक्ष शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या पाच जागा वाढल्या आहेत. एकनाथ शिंदे गट त्यांना सोडून गेल्यानंतर त्यांच्याकडे १५ आमदार होते आणि आता त्यांचे २० आमदार निवडून आले आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे निवडणुकीपूर्वी तेरा आमदार होते, तर आता त्यांचे दहा निवडून आले म्हणजे फक्त तीन कमी झाले. हिंदू लाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पद्धतशीर नियोजन आणि मुद्द्यावर आधारित प्रचार याचा सर्वाधिक फटका हा कॉंग्रेसला बसला. त्यांच्या जागा मागच्या वेळे पेक्षा २७ ने कमी झाल्या आणि त्या जागा महायुतीच्या पारड्यात पडल्या. आता जळगांव जिल्हात युतीचे मागच्या वेळी दहा आमदार होते ते दहाच्या दहा तर निवडून आलेच शिवाय रावेरची कॉंग्रेसची जागाही जिंकली. अकराच्या अकरा जागा पटकाविल्या. अशाच प्रकारे महायुतीच्या दिग्गजांनी आपापले गड राखले. उलट ईव्हीएमवर शंका घेऊन विरोधकांना हे म्हणायचे आहे का, की हे जे आमदार मागच्यावेळी जेव्हा तुमच्याकडून निवडून आले होते, तेव्हा पण ते ईव्हीएम फिक्स करूनचं निवडून आले होते? जे पक्ष सोडून गेले होते ते सर्वच दिग्गज होते आणि ते पुन्हा निवडून आले एवढाच विषय आहे. फक्त जाती जातीतील मतांच्या ध्रुवीकरणाचा डाव राज्यातील सुज्ञ जनतेने लोकसभेच्या निवडणुकीनंतर ओळखला. 'बटेंगे तो कंटेंगे', 'एक है तो सेफ़ है' या नाऱ्याला जनतेने साथ दिली आणि एकगठ्ठा मतदान केले. त्यामुळेच हे अभूतपूर्व यश मिळाले. लाडकी बहीण, महिलांना बसमध्ये प्रवास सवलत, हिंदूत्व आणि इतर लोकाभिमुख योजना लोकप्रिय ठरल्या. आपल्या चुका आणि अपयश लपविण्यासाठी ईव्हीएमचा आधार घेतला जात आहे, बाकी काहीही नाही.

**■ राजू खेडकर , जळगाव**

# मतपत्रिकेवरही झालं की रे मतदान!

**महाराष्ट्रात** दारुण पराभव झाल्यानंतर अस्वस्थ झालेले मतपत्रिकेच्या मतदानासाठी आग्रह धरत आहेत. मुळात, त्यांची मागणी दुराग्रही असली तरी ती वस्तुस्थितीला धरूनही नाही हे ही ठामपणे नमूद करावे लागेल. आता जे कुणी गोंधळवीर मतपत्रिकेवर मतदान घ्या असे म्हणत आहेत, त्यांना हे लक्षात आणून द्यायला हवे की, मतचिठ्ठी म्हणजे एकप्रकारे मतपत्रिकाच. प्रत्येक व्हीव्हीपॅट यंत्रात तुम्ही केलेल्या मतदानाचा तपशील सुस्पष्टपणे एका चिठ्ठीवर उमटतो. या मतचठ्ठीला सांभाळून ठेवले जातेच आणि अंतिम मतदानानंतर तिची ईव्हीएमच्या मतदानाशी पडताळणी सुद्धा होते. मतचिठ्ठीचे मतदान देशभरात प्रत्येक मतदान यंत्रासोबत नोंदवले जातेय. थोडक्यात, प्रत्येक मतदाराच्या मताचा कागदोपत्री पुरावा तयार होतोय, झालेला आहे आणि भविष्यातही होत राहणार आहे. मग, आणखी कशाला मतपत्रिकेवर मतदान घ्यायचे? मतचिठ्ठीवर झालेले मतदान मोजण्याची प्रक्रिया प्रत्येक निवडणुकीत उमेदवाराच्या मतमोजणी प्रतिनिधींच्या समक्ष आणि मान्यतेने संपन्न होते. तशी प्रक्रिया राबवून राज्यातल्या २८८ मतदान संघातील १४४० मतदान यंत्रातील मतचिठ्ठ्या संबंधित ईव्हीएममधील आकडेवारीशी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी ताडून पाहिल्या आहेत. त्यात कुठलीही तफावत आढळलेली नाही. अशी पडताळणी आजवर जिथे-जिथे आणि जेव्हा जेव्हा झाली तेव्हाही निकाल बदललेला नाही हे ही विशेष ! अशावेळी पुन्हा मतदान पत्रिकेवर मतदान घ्या, हा आग्रह निव्वळ टाईमपास आहे. राज्यात पराभवानंतर आत्मपरीक्षण करायचे सोडून जे माविआचे पाळीव ईव्हीएमच्या विरोधात गदारोळ घालत आहेत, या गोंधळवीरांची मतदार फक्त मजा घेतायत.

**■ प्रसाद काथे**

# नव्या वक्फ कायद्याची प्रतीक्षा

● ॲड. विलास पाटणे

> ‘जगप्रसिद्ध ताजमहाल वक्फ संपत्ती आहे,’ यावर कोण विश्वास ठेवेल? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपक मिश्रा यांनी विचारला आणि संपत्तीचे मूळ दस्तऐवज सादर करण्याचे आदेश दिले. उत्तर प्रदेश सुन्नी सेंट्रल बोर्डाने दाखल केलेल्या याचिकेवर सन २०१० मध्येच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण समितीने हरकत घेतल्यावर न्यायालयाने स्थगिती दिली. सोबत, ‘अशा मुद्द्यांवर न्यायालयाचा वेळ घालवू नका,’ अशी टिप्पणी केली.

**देवभूमी** द्वारकेतील बेट द्वारकामधील दोन बेटांची मालकी वक्फ बोर्डाकडे असल्याचा दावा गुजरात उच्च न्यायालयात केला गेला. ‘कृष्णनगरीत वक्फकडून असा दावा कसा काय करता येऊ शकतो?’ असे आश्चर्य न्यायाधीशांनी व्यक्त केले. भारतामधील ९.४ लाख एकर क्षेत्रफळ असलेल्या ८.७ लाख मालमत्तांवर वक्फ बोर्डाचा कब्जा आहे. या मालमत्तांचे आजचे मूल्य अंदाजे १.२ लाख कोटी रुपये इतके आहे. वक्फ बोर्डात आजमितीस नोंदणीकृत अशा ३,५६,०५१ मालमत्ता आहेत. त्यातील ८७२३२८ स्थावर, तर १६७१३ जंगम मालमत्ता आहेत. लष्कर आणि रेल्वे यांच्यानंतर वक्फ बोर्ड हे भारतामधील सर्वांत मोठे जमीनमालक आहे. कुठल्याही मुस्लिम राष्ट्रांमध्ये वक्फ मालमत्ता नाहीत. तुर्कीचे, लिबिया, इजिप्त, लेबनॉन, सीरिया, जॉर्डन, इराक या मुस्लिम राष्ट्रांमध्ये ‘वक्फ’च नाही.

भारतीय उपखंडात वक्फ बोर्डाची स्थापना ब्रिटीश




राजवटीत सन १९१३मध्ये करण्यात आली. ‘वक्फ’ म्हणजे परोपकाराने दिलेल्या, मुस्लिम कायद्याद्वारे मान्यताप्राप्त मालमत्तेचे कायमस्वरूपी समर्पण आहे. अनुदान मुश्रुतउल खिदमत तर असे समर्पण करणारी व्यक्ती वकीफ म्हणून ओळखली जाते. वक्फचे नियमन करणारा पहिला कायदा सन १९१३मध्ये लागू करण्यात आला.

केंद्रीय वक्फ परिषद ही अल्पसंख्यांक व्यवहार मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील एक वैधानिक संस्था आहे. वक्फ बोर्डाच्या कामकाजाशी संबंधित बाबीवर देखरेख करणारी केंद्र सरकारची संस्था म्हणून वक्फ कायदा १९५४ मधील तरतुदीनुसार या संस्थेची स्थापना करण्यात आली. हा कायदा रद्द झाल्यानंतर विद्यमान वक्फ कायदा १९९५ मध्ये मंजूर केला गेला.

सध्या देशात २८ राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांत मिळून तीस वक्फ बोर्ड आहेत. केंद्रशासित प्रदेश दीव-दमणमध्ये वक्फ बोर्ड नाही. वक्फ कायदा १९९५ हा जम्मू-काश्मीरला लागू नाही. वक्फ कायदा १९९५ आणि २०१३मधील त्यातील दुरुस्त्या या दोन्हीवर त्यांच्या अकार्यक्षमतेवरून सध्या टीका होते आहे. वक्फ मालमत्तांच्या अनुषंगाने अतिक्रमण, अव्यवस्था, स्वामित्वविषयक तंटे, तसेच सर्वेक्षणातील विलंब असे विविध प्रश्न उद्भवलेले आहेत. वक्फ बोर्डात अकाउंट्स, ऑडिट याची व्यवस्थाच नसते. वक्फ मालमत्तांचे स्वामित्व, ताबा, नोंदणीविषयक तक्रारी, न्यायाधिकरणाचे कामकाज या संदर्भातही अनेक शंका, प्रश्न उद्‌भवलेले आहेत. राज्य वक्फ मंडळाने देखील कायद्याचा दुरुपयोग केला. त्यावरून विविध समुदायांत विसंवाद आणि असंतोष

निर्माण झाला. एखादी मालमत्ता वक्फची आहे, असे घोषित करण्यासाठी कलम ४०चा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग झाला. यातून अनेक खटले उभे राहिले. वक्फ मंडळाच्या अपारदर्शकतेमुळे; तसेच त्यांना असलेल्या अनिर्बंध अधिकारांमुळे सर्वसामान्य जनतेला त्रास झाला. दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने, वक्फ बोर्ड बरखास्त करा, असा आदेश यापूर्वी दिला होता. सध्या हे प्रकरण प्रलंबित आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेने संयुक्त संसदीय समितीकडे पाठविले. बोर्डाच्या कार्यपद्धतीत सुधारणा, प्रशासनात गतिमानता आणि त्यातून कार्यकुशलता वाढविणे हे हेतू या विधेयकामागे आहेत. या कायद्यामधील अनेक दुरुस्त्या काँग्रेस राजवटीत सुचविल्या गेल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत देशभरात वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये वक्फ कायद्यात बदल करण्यासाठी १२० याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. असा कायदा करणे म्हणजे धार्मिक बाबतीत हस्तक्षेप नाही; तसेच त्यामुळे संविधानाचे उल्लंघनही होत नाही. नव्या कायद्याने महिला, लहान मुले; तसेच मागासवर्गीय यांना न्याय मिळेल. ॲड. अश्विनी उपाध्याय यांच्या मते, भारतात एक देश, दोन कायदे असू शकत नाहीत. देशात धार्मिक लवाद असू शकत नाही. सरकार वेगवेगळ्या मंदिरांकडून एक लाख कोटी रुपये गोळा करते. याउलट दर्गा, मशिद यांच्याकडून सरकार पैसे घेत नाही. दुसरीकडे, वक्फ बोर्डातील कर्मचाऱ्यांना सरकार पगार देते.

खरे पाहता प्रिव्ही कौन्सिलने वक्फ बोर्ड बेकायदेशीर ठरविले होते; परंतु १९१३च्या कायद्याने ते पुन्हा जिवंत केले. वक्फ बोर्डाला कोणत्याही मालमत्तेची चौकशी करता येते; तसेच कलम २८४/२८५नुसार त्यांच्या निर्णयास उच्च व सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येत नाही. वक्फ कायदा हा केवळ एका धर्माच्या मालमत्तेविषयी कायदा असल्याने दिल्ली उच्च न्यायालयात जनहित याचिका प्रलंबित आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या दृष्टीने अनेक मुद्द्यांवर यापूर्वी चर्चा झाली आहे. केंद्रीय वक्फ परिषद व राज्य वक्फ मंडळ यांचा पाया विस्तृत करणे, मुनवल्लींची भूमिका, दायित्व न्यायाधिकरणाची पुनर्रचना, शीर्षकाची घोषणा, मालमत्तांचे सर्वेक्षण, वार्षिक लेखाविवरण आणि वक्फ मालमत्तांचे विज्ञाननिष्ठ व्यवस्थापन या मुद्द्यांवर



विस्तृत चर्चा झाली. प्रस्तावित कायद्यात सर्वेक्षणाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. एखादी मालमत्ता वक्फच्या अंतर्गत येते की नाही, हे ठरविण्याचा वक्फ बोर्डाचा अधिकार काढून टाकण्यात आला आहे. लवादाचा निर्णय अंतिम राहणार नसून त्याविरुद्ध उच्च न्यायालयात आता दाद मागता येईल. के. रेहमान खान समितीच्या शिफारशीनुसार कायद्यात बदल सुचविण्यात आले आहेत. राज्यसभेच्या निवड समितीने या बदलाला मान्यता दिली आहे. ॲड. रॉफ रहीम म्हणतात, 'वक्फ कायद्यात मूलभूत बदल करण्याची गरज नाही; पण त्यात काही बदल गरजेचे आहेत. वक्फ बोर्डातील भ्रष्ट सदस्यांना तुरुंगात पाठवणे खूप महत्त्वाचे आहे.' वक्फच्या ९९ टक्के जमिनी या बेकायदेशीर अतिक्रमणांनी व्यापल्या आहेत. नव्या कायद्यामुळे वक्फची मालमत्ता कमी होईल आणि अतिक्रमण केलेले लोक आपोआप मालक होतील. वक्फ बोर्डावरील मुस्लिम आमदार, खासदार यांची मक्तेदारी कमी होईल. काँग्रेसच्या कार्यकाळात न्या. सच्चर समितीने सन २००५ मध्ये मुस्लिमांच्या भविष्यासाठी बदल सुचविले होते, त्याचे स्मरण येथे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, 'वक्फ बोर्डाला भारताच्या संविधानात जागा नाही.' हीच भूमिका बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षांनी घेतली आहे. संसदेच्या चालू अधिवेशनात या कायद्यातील विसंगती आणि संदिग्धता दूर करून वक्फ मालमत्तांच्या विज्ञाननिष्ठ प्रशासनासाठी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी नवीन कायदा प्रतीक्षेत आहे.

**(लेखक रत्नागिरी बार असोसिएशनचे अध्यक्ष आहेत.)**

**(सौजन्य: दै. महाराष्ट्र टाईम्स)**

# राजकारणात सगळेच राहावेत...

महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेतली. मुख्यमंत्री प्रथेप्रमाणे शपथविधी झाला की मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहार संघाशी वार्तालाप करण्यासाठी येत असतात. त्यानुसार, त्यांनी मंत्रालयातील दालनात पदभार स्वीकारला अन् राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला अधिक गतीने आणि जोमाने काम करण्यास सांगितले.



**तसेच,** विरोधी पक्षांच्या प्रश्नांना प्राधान्यक्रमाने स्थान देऊन त्यांचा सहभाग महत्वाचा असल्यासंदर्भात त्यांनी भाष्य केलं. महाराष्ट्राची राजकीय परंपरा जपत शत्रूत्व नसेल हेही त्यांनी सांगितलं. त्यावेळी, उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही फडणवीसांनी स्पष्ट शब्दात उत्तर दिलं. सिंचनातील नदी जोड प्रकल्प, सौर ऊर्जेचे १६ हजार मेगावॅटचे प्रकल्प असतील. सामाजिक क्षेत्रातील लाडकी बहीण योजना असेल, मुलींच्या शिक्षणातील १०० टक्के फी देण्याबाबतचे निर्णय पुढे सुरु ठेवायचे आहेत. आम्ही आमच्या वचननाम्यात, जाहीरनाम्यात जी आश्वासनं दिली आहेत ती पूर्ण करण्याच्या दृष्टीनं पावलं उचलायची आहेत. त्या दृष्टीनं पुढील काळात योग्य वेळी योग्य निर्णय करुन दिलेली आश्वासनं पूर्ण करणार आहोत. महाराष्ट्रातील जनतेला आश्वासित करु शकतो, सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारं सरकार पाहायला मिळेल.

### विरोधकांचा सन्मान करू

बदल्याचं राजकारण करायचं नाही, बदल दाखवेल, असं राजकारण करु, विरोधकांची संख्या कमी आहे, संख्येनुसार त्यांचं मूल्यमापन करणार नाही, त्यांनी योग्य विषय मांडले तर त्यांचा सन्मान देऊ, स्थिर सरकारची पाच वर्ष पाहायला मिळतील. जनतेची अपेक्षा देखील तिच आहे. राज्याला स्थिर सरकार मिळावं अशी जनतेची अपेक्षा आहे. लाडकी बहीण योजना सुरु ठेवणार आहोत, २१०० देखील देणार आहोत, बजेटच्या वेळी त्याचा विचार करु, आर्थिक सोर्सेस योग्य प्रकारे चॅनेलाईज झाल्यानंतर ते करता येतं. जी आश्वासनं दिली आहेत ती पूर्ण करु, निकषात असतील त्यांना लाभ मिळेल, निकषाच्या बाहेरच्या बहिणी मिळाल्या तर त्याचा पुनर्विचार करु, मात्र सरसकट पुनर्विचार होणार नाही.

### उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यावरही उत्तर

मी उद्धव ठाकरे, शरद पवार, राज ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांसह सर्वच प्रमुख नेत्यांना फोन करून शपथविधी सोहळ्याचं निमंत्रण दिलं. त्यावेळी, सगळ्यांनी माझं अभिनंदन केलं, पण ते वैयक्तिक कारणास्तव शपथविधीला येऊ शकले नाहीत. महाराष्ट्रात जो राजकीय संवाद आहे, विशेषतः दाक्षिणात्य राज्यांमध्ये आणि महाराष्ट्रात हा फरक आहे, महाराष्ट्रात राजकीय संवाद संपला नाही. पण अनेक राज्यामध्ये दोन राजकीय पक्ष आणि नेत्यांमध्ये एवढा विसंवाद असतो की जणू 'खून के प्यासें' असं पाहायला मिळतं. महाराष्ट्रात ती कधी नव्हती आणि पुढेही राहू नये हा माझा प्रयत्न राहिन. त्यावेळी, उद्धव ठाकरेंनी केलेल्या एक तर तू राहिन किंवा मी राहिन या वक्तव्यासंदर्भात त्यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर देखील फडणवीस यांनी स्पष्ट शब्दात उत्तर दिले. ''मी त्याही वेळेस सांगितलं होतं. राजकारणात तेही राहतील, मीही राहिन, सगळेच राहतात.'' ■

# सेवाभावी, दूरदृष्टी असलेला लोकनेता



महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचे लाडके भाऊ आणि सर्वांचे लाडके भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले आहेत. संघ स्वयंसेवक, नगरसेवक, महापौर, आमदार, विरोधी पक्ष नेता, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री ते आता मुख्यमंत्री असा देवेंद्र फडणवीस यांचा खूप मोठा राजकीय प्रवास आहे. त्यांना दूरदृष्टी असलेला नेता म्हटले जाते.

**२०१४** ला देवेंद्र फडणवीस हे वयाच्या ४४ व्या वर्षी पहिल्यांदा राज्याचे मुख्यमंत्री बनले. ते राज्यातील दुसरे तरुण मुख्यमंत्री ठरले. फडणवीसांनी मुख्यमंत्री असताना राज्याच्या विकासाच्या दृष्टीने जे निर्णय घेतले, त्यामुळे राज्याच्या विकासाला योग्य दिशा आणि गती मिळाली. त्यांनी राज्यात अनेक विकास प्रकल्प राबवले. जनहितार्थ अनेक योजना राबवल्या. राज्यात मेट्रोचे जाळे उभारण्यात देवेंद्र फडणवीसांचं महत्वपूर्ण योगदान असून त्यांना 'मेट्रो मॅन' म्हणून ओळखले जाते.

देवेंद्र फडणवीसांच्या जलयुक्त शिवार योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. देवेंद्र फडणवीसांच्या पुढाकारामुळेच 'लाडकी बहीण' योजना राबवली गेली. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'समृद्धी महामार्ग' हा राज्याच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टी निर्णयांमुळेच महाराष्ट्र हे सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणुक आणणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास ' हा संकल्प देवेंद्र फडणवीस हे समर्थपणे पुढे नेत आहेत.

देवेंद्र फडणवीसांनी समाजातील प्रत्येक घटकाला न्याय दिला. कधी कोणाशी भेदभाव केला नाही. देवेंद्र फडणवीसांच्या राजकीय प्रवासात अनेक कठीण प्रसंग आले. पण ते डगमगले नाहीत. त्यांनी कठीण प्रसंगांवर मात करून स्वतःला सिद्ध केलं. परिस्थिती कितीही गंभीर असो, त्यावर तोडगा काढण्यात देवेंद्रजींचा विशेष हातखंडा आहे. देवेंद्र फडणवीसांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेक मानाची पदे भूषवली. प्रत्येक पदावर त्यांची कामगिरी सर्वोत्तम राहिली आहे. देवेंद्र फडणवीस यांना देश-विदेशातील अनेक नामांकित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे. देवेंद्र फडणवीसांनी नेहमीच राष्ट्रसेवा आणि जनसेवेला प्रथम प्राधान्य दिले आहे. राजकारणात देवेंद्र फडणवीसांना अनेकदा अपयशाचा





सामना करावा लागला. पण त्यांनी कधीही अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडले नाही. अपयश मान्य करून नव्या जोमात कामाला सुरुवात केली. राजकारणात एक नामांकित आणि यशस्वी नेता म्हणून उदयाला येऊनही देवेंद्र फडणवीस यांनी अहंकाराला कधीच थारा दिला नाही. त्यांचा जनसंपर्क आजही दांडगा आहे. लोक त्यांना प्रेमाने 'देवा भाऊ' म्हणतात. जनतेला देवेंद्र फडणवीसांवर प्रचंड विश्वास आहे. देवेंद्र फडणवीस जे बोलतात ते करून दाखवतात. म्हणूनच जनतेने देवेंद्र फडणवीसांच्या विकास नीतीला प्राधान्य देत, महायुती सरकारला पुन्हा एकदा कौल दिला. देवेंद्र फडणवीसांच्या संघटन कौशल्य आणि रणनीतीमुळे भाजपला महाराष्ट्रात बळकटी मिळाली. राजकारणातील चाणक्य म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. राज्यात महायुतीचं सरकार आणण्यात देवेंद्र फडणवीसांचं विशेष योगदान आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपला १३२ जागा जिंकवून देवेंद्र फडणवीसांनी राज्याच्या राजकारणात एक नवा इतिहास रचला. देवेंद्र फडणवीस हे उत्कृष्ट वक्ते आहेत. त्यांच्या विधानांची नेहमीच चर्चा असते. विधानसभेतील देवेंद्र फडणवीसांचं एक विधान खूप गाजलं. ते म्हणाले होते कि, 'मेरा पानी उतरता देख, मेरे किनारे पर घर मत बसा लेना, मै समंदर हू लौट कर वापस आऊंगा.' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुन्हा एकदा इतिहास घडवणार याची पूर्ण खात्री आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचं अभिनंदन आणि पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.

**■ मनोहर भीमाबाई जयसिंग विश्वासराव**
**मुक्त पत्रकार**

# आयुष्मान वय वंदना कार्डसाठी नोंदणीने गाठला 25 लाखांचा टप्पा




**आयुष्मान वय वंदना कार्डसाठी ज्येष्ठ नागरिकांनी दाखवलेल्या उत्साहाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे .**

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रारंभ केलेल्या आयुष्मान वय वंदना कार्डसाठी नोंदणीने २५ लाखांचा टप्पा गाठला आहे. ही कामगिरी दोन महिन्यांपेक्षाही कमी कालावधीमध्ये पार पाडली.

आयुष्मान वय वंदना कार्डचा प्रारंभ झाल्यापासून ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या २२००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी आत्तापर्यंत ४० कोटींहून अधिक किमतीच्या उपचारांचा लाभ घेतला आहे. या योजनेतून ज्येष्ठ नागरिकांना कोरोनरी अँजिओप्लास्टी, हिप फ्रॅक्चर/रिप्लेसमेंट, पित्ताशय काढून टाकणे, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, प्रोस्टेट रेसेक्शन, स्ट्रोक, हेमोडायलिसिस, आतड्यांसंबंधी ताप आणि इतर तापजन्य आजार इत्यादींवर उपचार दिले जात आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ ऑक्टोबर २०२४ रोजी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा (एबी–पीएम–जेएवाय) विस्तार करण्याची घोषणा केली. यामध्ये ७० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना समाविष्ट करण्यात आले आहे. आयुष्मान योजनेच्या विस्तारांतर्गत, ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान वय वंदना कार्ड दिले जात आहे. या कार्डामुळे त्यांना आरोग्य सेवेचे लाभ मिळविण्यासाठी मदत होईल.

आयुष्मान वय वंदना कार्ड ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या सामाजिक–आर्थिक स्थिती काय आहे, याकडे न पाहता, प्रारंभी ५ लाख रुपयांचे मोफत आरोग्य कवच प्रदान करते. एबी–पीएम–जेएवाय अंतर्गत आधीच समाविष्ट असलेल्या कुटुंबातील ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना स्वतःसाठी प्रति वर्ष रूपये ५ लाखांपर्यंतचे अतिरिक्त 'टॉप–अप' कवच मिळते. केंद्र सरकारची आरोग्य योजना (सीजीएचएस), माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना (ईसीएचएस), आणि आयुष्मान केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) यासह विविध सरकारी योजनांचा लाभ आधीपासून घेत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या विद्यमान योजनेपैकी एक पर्याय निवडावा लागेल; किंवा ते आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा पर्याय निवडू शकतात. याशिवाय, खाजगी आरोग्य विमा संरक्षण किंवा कर्मचारी राज्य विमा योजनेचे सदस्य असलेल्या व्यक्ती एबी–पीएम'जेएवाय चा लाभ घेण्यास पात्र आहेत.

'एक्स'वर त्यांनी म्हटले आहे की:

**आयुष्मान वय वंदना कार्डसाठी आपल्या ज्येष्ठ नागरिकांनी जो उत्साह दाखवला आहे, तो खूप आनंददायी आहे. त्यांच्या उत्तम आणि निरामय आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी आम्ही आमच्या प्रयत्नांमध्ये कोणतीही कसर बाकी ठेवली जाणार नाही. माझा आग्रह आहे की, जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.**

# पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेत २. ६७ कोटी घरे बांधून पूर्ण

**केंद्रीय** ग्रामीण विकास तसेच कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ग्रामीण विकास मंत्रालयाच्या कामगिरीविषयी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. महिलांना सक्षम करणे हे सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे ते म्हणाले. यंदा आपल्या मंत्रालयाची अर्थसंकल्पीय तरतूद एक लाख ८४ हजार कोटी होती, त्यापैकी एक लाख ३ हजार कोटी खर्च झाल्याची माहिती त्यांनी दिली. मनरेगा अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसारख्या योजना मागणीवर आधारित असून अंदाजपत्रकातील तरतूद कमी पडत आहे तिथे राज्यांच्या मागणीच्या आधारावर अर्थ मंत्रालयाकडून अतिरिक्त निधी मागवला जात आहे, असे त्यांनी नमूद केले.

### प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण

**प्रधानमंत्री आवास योजना –** ग्रामीण अंतर्गत मार्च २०२४ पर्यंत २.९५ कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, त्यापैकी जवळपास सर्व घरे मंजूर झाली आहेत आणि २.६७ कोटी घरे पूर्ण झाली आहेत, अशी माहिती चौहान यांनी दिली. ग्रामीण भारताचा विकास करताना सरकारचे उद्दिष्ट केवळ घरे देणे नसून या घरांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे हे आहे, असे चौहान यांनी सांगितले.

### प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पीएमजीएसवाय)

**पीएमजीएसवाय आढावा:**

**पीएमजीएसवायच्या विविध घटकांतर्गत योगदान:**

९ जून २०२४ ते २ डिसेंबर २०२४ पर्यंत ९,०१३ किमी रस्त्यांना मंजुरी देण्यात आली, त्यापैकी ७,०५८ किमीचे बांधकाम झाले आहे आणि योजना सुरू झाल्यापासून २ डिसेंबर २०२४ पर्यंत १,०६७ वस्त्यांना जोडण्यात आले आहे.

**पीएमजीएसवाय–खत:** पीएमजीएसवाय–खतसाठी मार्गदर्शक तत्त्वांना अंतिम स्वरूप देण्यात आले असून ही तत्त्वे लवकरच जाहीर केली जातील.

**पीएम–जनमन:**९ जून २०२४ ते २ डिसेंबर २०२४ या कालावधीत २,३३७ किमीच्या रस्त्यांना मंजुरी, त्यापैकी १२ किमीचे बांधकाम पूर्ण.

### दीनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (डीएवाय– एनआरएलएम)

**लखपती दीदी**

**नवीन लखपती दीदींना प्रशिक्षित करणे:**

९ जून २०२४ नंतर, डे– एनआरएलएमअंतर्गत विविध राज्य–नेतृत्वाच्या उपक्रमांद्वारे १.५ दशलक्ष नवीन लखपती दिदींना सक्षम केले आहे.

**संचयी प्रभाव:** देशभरातील लखपती दिदींची एकूण संख्या १,१५,००,२७४ वर पोहोचली आहे.

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमजीएनआरइजीएस)

केंद्रीय मंत्री चौहान यांनी सांगितले की, ग्रामीण भागात उपजीविका सुरक्षा वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातल्या प्रत्येक घरातील प्रौढ सदस्य जे स्वेच्छेने काम करायला तयार आहेत त्यांना एका आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांच्या रोजगाराची हमी या योजनेने दिली आहे. १२३ कोटी श्रम दिवसांचे काम निर्माण झाले आहे.

**मिशन अमृत सरोवर:**

२४ एप्रिल २०२२ रोजी पंतप्रधानांनी हे मिशन सुरू केले. भविष्यातील जलसंधारणासाठी प्रत्येक ग्रामीण जिल्ह्यात (दिल्ली, चंदीगड आणि लक्षद्वीप वगळता) ७५ अमृत सरोवरांचे बांधकाम किंवा पुनरुज्जीवन करायचे आहे. आत्तापर्यंत, ६८,००० हून अधिक अमृत सरोवरांचे बांधकाम/पुनर्जीवन करण्यात आले आहे.

### दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजना (डीडीयू–जीकेवाय)

**नवीन उपक्रम**

दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजना २.० ची मार्गदर्शक तत्त्वे मंजूर करण्यात आली आहेत. ग्रामीण गरीब तरुणांचा कौशल्य विकास करून त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी ही योजना साहाय्य करते. ■

# केंद्र सरकार 50% हून अधिक एमएसपी निश्चित करणार आणि शेतमाल खरेदी करणार

**केंद्रीय** कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्यसभेत उत्तर देताना सांगितले की काँग्रेसने यापूर्वी सत्तेवर असताना शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी किमान हमीभाव (एमएसपी) देण्यास नकार दिला होता. याउलट, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या दशकभरात सातत्याने 'एमएसपी'मध्ये वाढ केली आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांकडून एमएसपीवर पीक खरेदी करत राहील अशी ग्वाही चौहान यांनी दिली आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. चौहान म्हणाले की, सरकार उत्पादन खर्चाच्या ५०% पेक्षा जास्त किमान हमीभाव निश्चित करण्याबरोबरच शेतकऱ्यांकडून शेतमालाची खरेदीही करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार शेतकऱ्यांना फायदेशीर भाव मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे.

शेतकऱ्यांच्या शेतमालाची किमान हमीभावानुसार खरेदी केली जाईल असे आश्वासन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिले. आमचे सरकार ५०% पेक्षा जास्त एमएसपी निश्चित करेल आणि उत्पादनाची खरेदी देखील करेल. हे नरेंद्र मोदींचे सरकार आहे, मोदींची ग्यारंटी म्हणजे आश्वासन पूर्ण होणारच, असे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, काँग्रेस सत्तेत असताना त्यांनी म्हटले होते की आम्ही एमएस स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारू शकत नाही. २०१९ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने निर्णय घेतला की खर्चावर ५०% नफा जोडून एमएसपी दर निश्चित केले जातील. काँग्रेस सरकार सत्तेवर असताना त्यांनी कधीही शेतकऱ्यांना ५०% टक्क्यांपेक्षा जास्त नफा दिला नाही, मात्र आम्ही कटिबद्ध आहोत आणि किमान ५०% टक्क्यांपेक्षा जास्त नफा देऊन शेतकऱ्यांचे पीक खरेदी करू. चौहान म्हणाले की, सरकार केवळ खतेच पुरवत नाही तर शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी अनुदानही देते. अलिकडेच शेतकऱ्यांना १ लाख ९४ हजार कोटींचे अनुदान वितरित करण्यात आले. ■

# नॅनो युरिया प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रांवर उपलब्ध

**शेतकऱ्यांमध्ये नॅनो खतांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी, खालील पावले उचलण्यात आली आहेत:**


- जागरूकता शिबिरे, वेबिनार, नुक्कड नाटक, क्षेत्रीय प्रात्यक्षिके, किसान संमेलने आणि प्रादेशिक भाषांमधील चित्रपट यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून नॅनो युरियाच्या वापराला प्रोत्साहन दिले जाते.
- संबंधित कंपन्यांकडून नॅनो युरिया प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रांवर उपलब्ध करून दिला जात आहे.
- नॅनो युरियाचा समावेश खते विभागाने नियमितपणे जारी केलेल्या मासिक पुरवठा योजनेत करण्यात आला आहे.
- भारतीय मृदा विज्ञान संस्था, भोपाळच्या माध्यमातून आयसीएआरने अलीकडेच खताचा कार्यक्षम आणि संतुलित वापर (नॅनो-फर्टिलायझर्ससह) या विषयावर राष्ट्रीय मोहीम आयोजित केली होती.
- १५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेत नॅनो खतांचा वापराला प्रोत्साहन देण्यात आले.
- १५,००० महिला बचत गटांना ड्रोन पुरविण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारने 'नमो ड्रोन दीदी' योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत, खत कंपन्यांद्वारे महिला बचत गटांच्या नमो ड्रोन दीदींना १०९४ ड्रोन उपलब्ध करून देण्यात आले, जे ड्रोनद्वारे नॅनो खतांचा वाढीव वापर सुनिश्चित करत आहेत.
- खत कंपन्यांच्या सहकार्याने खते विभागाने सल्लामसलत आणि क्षेत्रीय स्तरावर प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून देशाच्या सर्व १५ कृषी योग्य हवामान क्षेत्रांमध्ये नॅनो डीएपीचा अवलंब करण्यासाठी महाअभियान सुरू केले. तसेच खते विभागाने खत कंपन्यांच्या सहकार्याने देशातील १०० जिल्ह्यांमध्ये नॅनो युरिया प्लसचे क्षेत्रीय प्रात्यक्षिक आणि जनजागृती कार्यक्रमांसाठी देखील अभियान सुरू केले आहे.
- खत कंपन्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅनो डीएपीच्या उत्पादन आणि लॉजिस्टिकमध्ये कोणतीही महत्त्वपूर्ण आव्हाने नाहीत. ■

# नूतन मंत्रिमंडळाचे अभिनंदन



चंद्रशेखर बावनकुळे


राधाकृष्ण विखे-पाटील


चंद्रकांतदादा पाटील



गिरीश महाजन


गणेश नाईक


मंगलप्रभात लोढा


जयकुमार रावल


पंकजा मुंडे



अतुल सावे


अशोक उईके


आशिष शेलार


शिवेंद्रसिंहराजे भोसले


जयकुमार गोरे


संजय सावकारे


नितेश राणे


आकाश फुंडकर


माधुरी मिसाळ


पंकज भोयर


मेघना बोर्डीकर

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटी घेतल्या.



प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com